| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ९ वा | शुक्रवार, दिनांक २० मार्च २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## भारतात युद्ध रोखण्याची, संपूर्ण जगाला एकजूट करण्याची शक्ती

### मोहन भागवत यांचे मोठे वक्तव्य

***नागपूर/प्रतिनिधी : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण विधान केले आहे. जगात कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित होण्यासाठी स्वार्थाचा त्याग, एकता आणि चांगल्या मूल्यांचे पालन आवश्यक आहे. नागपूर येथे विश्व हिंदू परिषद कार्यालयाच्या भूमिपूजनानंतर आयोजित सभेत ते बोलत होते.***



भागवत यांनी जागतिक संघर्षांच्या मुळाशी स्वार्थ आणि वर्चस्व गाजवण्याची मानसिकता असल्याचे सांगितले. याच कारणामुळे जगभरात युद्धे आणि संघर्ष सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणतात, गेल्या दोन हजार वर्षांपासून जग विविध विचारसरणींच्या माध्यमातून संघर्ष सोडवण्याचा प्रयत्न करत आहे, मात्र त्यात विशेष यश मिळालेले नाही. धार्मिक असहिष्णुता, जबरदस्ती धर्मांतर आणि श्रेष्ठत्व-हीनत्वाच्या भावना आजही अस्तित्वात असल्याचे त्यांनी नमूद केले.भागवत यांनी ठामपणे सांगितले की, सध्या सुरू असलेल्या जागतिक युद्धांना थांबवण्याची क्षमता भारतात आहे. संघर्षात अर्थ नाही, समन्वयातच खरा अर्थ आहे. भारताची 'सर्व एक आहेत' ही प्राचीन परंपरा जगाला सौहार्दाचा मार्ग दाखवू शकते. मात्र, त्यासाठी देशात धर्माचे पालन होणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.


आरएसएस प्रमुखांनी धर्माच्या संकल्पनेवर भाष्य करताना सांगितले की, धर्म हा केवळ शास्त्रांपुरता मर्यादित नसून, तो लोकांच्या आचरणातही दिसला पाहिजे. अनुशासन आणि नैतिक मूल्यांचे पालन करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

**मानवतेचा दृष्टिकोन भारताची ओळख**

भागवत यांनी सांगितले की, भारत मानवतेच्या दृष्टिकोनावर विश्वास ठेवतो, तर इतर अनेक देश शक्ती आणि वर्चस्वाला अधिक महत्त्व देतात. भारताचे संविधान आणि सांस्कृतिक वारसा हीच विचारसरणी प्रतिबिंबित करतात.

जग सध्या विनाशाच्या दिशेने जात असल्याची चिंता व्यक्त करत भागवत म्हणाले की, आजच्या परिस्थितीत संघर्ष नव्हे तर सहकार्य आणि सौहार्दाची आवश्यकता आहे. आधुनिक विज्ञानही हळूहळू 'सर्व एक आहेत' या विचाराकडे झुकत असल्याचे त्यांनी सांगितले.

## अशोक खरात प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसने मांडली रोखठोक भूमिका





**मुंबई/प्रतिनिधी :** अंकशास्त्राच्या आधारे भविष्य सांगण्याचा दावा करणाऱ्या सिन्नर तालुक्यातील भोंदू अशोक खरातविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. त्याने अनेक महिलांवर त्याच्या कार्यालयात लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. दरम्यान, या अशोक खरातचे अनेक राजकीय हितसंबंधही समोर आले आहेत. राज्यातील अनेक बडे नेते त्याच्याकडे ज्योतिषी मार्गदर्शनासाठी जात होते, असा दावा केला जातोय. तसंच, यामध्ये राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचंही नाव समोर आलंय. त्यांचे अनेक फोटोही समोर आले आहेत. दरम्यान, या सर्व प्रकारावर आता अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून अधिकृत भूमिका जाहीर करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांनी आज पत्रकार परिषद घेऊन याप्रकरणी सखोल चौकशी करणार असल्याचं सांगितलं.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या आणि राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचे अशोक खरात यांच्याबरोबर अनेक फोटो समाज माध्यमांवर व्हायरल होत आहेत. या फोटोंमध्ये त्या अशोक खरातच्या पाया पडताना, पाद्यपूजन करताना, छत्री धरताना दिसत आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसवरही टीका होत असून त्यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष पदावरून हटवण्याची मागणी होत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर प्रफुल पटेल यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका स्पष्ट केली.

प्रफुल पटेल पत्रकार परिषदेत म्हणाले, अशोक खरात प्रकरणी निश्चित कारवाई केली जाणार आहे. या तपासणीतून आणि चौकशीतून ज्यांची नावे समोर येतील त्यांच्यावर तातडीने आणि सक्तीने कारवाई केली जाणार आहे. या प्रकरणात अनेक राजकीय लोकांचीही नावे जोडली गेली आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून योग्य ती कारवाई करू. येणाऱ्या एक-दोन दिवसांत हे करू.

**अशोक खरात प्रकरण नेमकं काय?**

सरकारवाडा पोलीस ठाण्यात महिलेने अशोक खरातविरुध्द दिलेल्या तक्रारीनुसार, स्वतः कडे दैवी शक्ती असल्याचा दावा करून मंत्र तंत्र आणि धार्मिक विधीच्या नावाखाली खरातने विश्वास संपादन केला. यानंतर त्याने कार्यालयात बोलावून गुंगीकारक पदार्थ खाण्यास दिल्यानंतर अत्याचार केला. २०२२ पासून डिसेंबर २०२५ पर्यंत हा प्रकार सुरू होता, असे तक्रारीत नमूद आहे. या तक्रारीनंतर नाशिक गुन्हे शाखेच्या पथकाने बुधवारी पहाटे खरात यास ताब्यात घेतले. त्याच्या कार्यालयातील तपासात ५८ आक्षेपार्ह चित्रफिती सापडल्या.

त्याला नाशिक जिल्हा सत्र न्यायालयात उपस्थित केले असता २४ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली. पोलिसांनी नाशिक शहरातील कॅनडा कॉर्नर परिसरातील त्याच्या कार्यालयावर छापा टाकला. या छाप्यात महत्त्वाचे पुरावे आणि काही चित्रफिती सापडल्या. नामांकित महिला, वरिष्ठ अधिकारी आणि काही राजकीय नेत्यांची माहिती चित्रफितीत असल्याचे बोलले जाते. गुन्हे शाखा युनिट एकचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंचल मुदगल यांनी, खरात याच्याविरुद्ध आतापर्यंत एकाच महिलेने तक्रार दिली असून, आणखी काही महिला तक्रारीसाठी पुढे येऊ शकतात, असे सांगितले.

### सातारा झेडपी अध्यक्ष निवडीत सिनेस्टाईल थरार

**सातारा/प्रतिनिधी :** सातारा झेडपी अध्यक्ष निवडीत सिनेस्टाईल थरार, भाजपकडून फोडाफोडी अन् अटकेचाही डाव; सदस्यांना सभागृहात घेऊन जाण्याच्या झटापटीत मंत्री शंभूराज देसाईंच्या हाताला लागलं

नसातारा जिल्हा परिषद अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवडीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याच्या राजकारणात आज प्रचंड थरार पाहायला मिळाल. भाजपकडून राष्ट्रवादी आणि शिवसेनेचे सदस्य फोडण्याचा जोरदार प्रयत्न शेवटपर्यंत सुरू होते. राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या काही सदस्यांवर गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्याचा कथित प्लॅनही आखण्यात आले होता.

## साई मंदिरात माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते आरती



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील विशाल नगर भागातील श्री साई मंदिरात गुढीपाडवा निमित्ताने गुरुवारी सायंकाळी माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांनी साईबाबा चे दर्शन घेतले त्यानंतर त्यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत आरती करण्यात आली

यावेळी राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील जागृति शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोक काळे , रेणा साखर कारखान्याचे अध्यक्ष अनंतराव देशमुख जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव,रामदास पवार सचीन दाताळ बाजीराव संभाजी सुळ शिवाजी कांबळे गोविन्द डुरे, ज्ञानेश्वर भिसे,रमेश सुर्यवंशी अमोल शिंदे महेंद्र भादेकर, सुपर्ण जगताप डॉ आनंद पवार विकास देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी मंदिर संस्थानच्या वतीने माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

### देवणी ग्रामीण रुग्णालयात मूलभूत सुविधेअभावी रुग्णांचे होताहेत हाल

**देवणी/प्रतिनिधी :**शहरासह ग्रामीण भागातील वाढती लोकसंख्या अन रुग्णसंख्येपुढे आरोग्यसेवा व सुविधा अपुर्ण पडत असुन त्यामुळे आरोग्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. देवणी ग्रामीण रुग्णालयात मूलभूत सुविधेच्या अभावी रुग्णांचे हाल होत आहेत. देवणी सिमाभागातील शेवटचा तालुका असल्याने लगतच्या भालकी तालुक्यातील रुग्णांचा अतिरिक्त भार तालुक्यातील आरोग्य यंत्रणेवर पडत असल्याने उपलब्ध सुविधा अपुऱ्या पडत आहेत. शिवाय गंभीर अन अपघातग्रस्त रुग्णाना वेळेवर उपचार मिळत नसल्यामुळे लातुर ,उदगीरसह मोठ्या शहरात उपचार घ्यावे लागत आहेत. त्यातुन वेळ पैसा अन आरोग्य याबाबत गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होत आहेत. तालुक्यातील ग्रामीण अन दुर्गम भाग असलेल्या मांजरा नदीपट्यासह सर्वच रुग्णांना देवणी ,वलांडी या दोन मुख्य गावातील आरोग्य सुविधांवरच अवलंबुन रहावे लागते. मात्र बहुतांश वेळ याठिकाणी वैद्यकीय अधिकारीच उपलब्ध होत नसल्याने रुग्णाच्या नातेवाईकांना अनेक अडचणींचा डोंगर पार करावा लागतो. शिवाय या भागात खाजगी रुग्णालयातही रात्रीच्या वेळी आरोग्य सेवा उपलब्ध नसल्यामुळे केवळ दिवसाच्या रुग्णाचीच सोय होताना दिसते. शहरासह ग्रामीण भागातील अपघातासह सर्वच गंभीर रुग्णांना उपचार करण्यासाठी आवश्यक पायाभुत सुविधा अन् प्रशिक्षित मनुष्यबळ नसल्यामुळे त्यांच्या आरोग्याच्या प्रश्न गुंतागुंतीच्या ठरत आहे.

## लातूर जिल्हा पोलीस शिपाई भरती २०२४-२०२५ ची ३० उमेदवारांची तात्पुरती निवड व प्रतीक्षा यादी जाहीर

### राज्यात सर्वप्रथम यादी प्रसिद्ध - पारदर्शक व जलद प्रक्रियेचा आदर्श नमुना

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई भरती सन २०२४-२०२५ अंतर्गत गुणवत्तेनुसार प्रवर्गनिहाय ३० उमेदवारांची तात्पुरती (Provisional) निवड यादी तसेच प्रतीक्षा यादी दिनांक १९ मार्च २०२६ रोजी जाहीर करण्यात आली आहे. सदर यादी लातूर जिल्हा पोलीस दलाच्या अधिकृत संकेतस्थळ https://laturpolice.gov.inG$ वर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

या भरती प्रक्रियेमध्ये मैदानी चाचण्या, लेखी परीक्षा व इतर सर्व टप्पे अत्यंत काटेकोरपणे, पारदर्शक पद्धतीने व नियमानुसार पार पाडण्यात आले. मा. पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण प्रक्रिया सुयोग्य नियोजन, प्रभावी अंमलबजावणी व वेळेचे अचूक व्यवस्थापन यामुळे अल्पावधीत पूर्ण करण्यात आली.

विशेष म्हणजे, राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत लातूर जिल्हा पोलीस दलाने सर्वप्रथम तात्पुरती निवड यादी जाहीर करण्याचा मान मिळविला आहे. ही बाब लातूर पोलिसांच्या कार्यक्षमतेचे, पारदर्शकतेचे व उत्तरदायित्वाचे द्योतक आहे. गुढीपाडवा व रमजान ईद या सणांच्या पूर्वसंध्येला ही निवड यादी जाहीर झाल्यामुळे निवड झालेल्या उमेदवारांसाठी हा क्षण अत्यंत आनंददायी व त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा ठरत आहे. दीर्घ काळ मेहनत घेऊन स्पर्धात्मक प्रक्रियेत यश मिळवलेल्या उमेदवारांच्या कुटुंबीयांमध्ये देखील समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर निवड ही तात्पुरती (Provisional) असून पुढील कागदपत्र पडताळणी व आवश्यक शासकीय प्रक्रियांच्या अधीन राहील. उमेदवारांनी पुढील सूचनांसाठी नियमितपणे अधिकृत संकेतस्थळाला भेट देणे आवश्यक आहे.

लातूर जिल्हा पोलीस दलाने राबविलेली ही भरती प्रक्रिया राज्यातील इतर जिल्ह्यांसाठी एक आदर्श नमुना ठरत असून, नागरिकांमध्ये पोलीस प्रशासनाबद्दल विश्वास व सकारात्मकता निर्माण करणारी ठरली आहे.

### प्रभात किरणे

**घर अंगण स्वच्छ,**
**प्रसन्न वाटते तैसे तन**
**असता,आरोग्य लाभते**
**स्वकष्टातून मिळवता,**
**मिळे सुख फुकटाचे,**
**लबाडाचे दुःखच दुःख**
**-इंजि. नागनाथ कलवले**
**लातूर ९१-९७६४७ ८८२८८**

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**शिक्षकांना उन्हाळी सुट्टीत करावे लागणार जनगणनेचे काम...?**

### चिमटा दयाचा



**श्रध्देच्या आडून अंधश्रध्दा**
**पसरवली जाते !**
**त्यातून खरात**
**सारखे उदयास येते !!**
**यातून भोंदूबाबा निर्माण**
**होवून लैंगिक शोषण**
**केले जाते !!**

## पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर उपक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद

### रेणापूर व मुरुड येथील दीर्घकालीन तंटे सह जिल्ह्यातील ४९ तंटे सामंजस्याने निकाली





**लातूर/प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील जमीन व शेतीसंदर्भातील वादांमुळे सामाजिक तणाव निर्माण होऊन अनेक वेळा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. असे वाद वर्षानुवर्षे प्रलंबित राहिल्यामुळे शेतकऱ्यांना मानसिक, आर्थिक व सामाजिक त्रास सहन करावा लागतो. या पार्श्वभूमीवर मा. पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर या उपक्रमाला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, प्रत्यक्ष शेतात जाऊन वाद निवारण करण्याच्या या उपक्रमातून अत्यंत प्रभावी परिणाम दिसून येत आहेत.

७ रेणापूर पोलीस ठाणे - दोन वर्षांपासून प्रलंबित वादाचा शेवट. रेणापूर पोलीस ठाणे हद्दीतील नेहरू नगर शिवारामध्ये अर्जदार सोमनाथ रमेश भोसले यांनी दिनांक १०/०२/२०२६ रोजी शेती रस्त्याच्या वादासंदर्भात तक्रार (NC क्र. ८४/२६) दाखल केली होती. सदर वाद हा अर्जदार व गैरअर्जदार यांच्यात मागील दोन वर्षांपासून सुरू होता. या कालावधीत परस्परांविरुद्ध ४ वेळा NC दाखल झाल्या होत्या. शेतात जाण्यासाठी १० फूट रुंदीचा रस्ता देण्याच्या मुद्द्यावरून वारंवार वाद, भांडणे व पोलीस तक्रारी होत होत्या; मात्र कायमस्वरूपी तोडगा निघत नव्हता. पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर या उपक्रमांतर्गत पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांनी स्टाफसह प्रत्यक्ष शेतात भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

गावातील प्रतिष्ठित नागरिक व दोन्ही पक्षकारांना समोरासमोर बसवून सखोल चर्चा करण्यात आली. वादाचे मूळ कारण समजून घेऊन, सामाजिक सलोखा जपण्याच्या दृष्टीने व कायदेशीर बाबींचा विचार करून दोन्ही पक्षांची समजूत काढण्यात आली. परिणामी, दोन्ही पक्षांच्या संमतीने सामोपचाराने वाद कायमचा मिटविण्यात आला, ज्यामुळे दोन वर्षांपासून सुरू असलेला तणाव पूर्णतः समाप्त झाला.

७ मुरुड पोलीस ठाणे - ८ ते १० वर्षांपासून सुरू असलेला वाद निकाली. मुरुड पोलीस ठाणे हद्दीतील मौजे भोसा येथे शंकर रंगराव खोसे, भीमराव रंगराव खोसे व लक्ष्मण व्यंकट खोसे यांच्यात ८ ते १० वर्षांपासून शेत रस्त्याचा वाद सुरू होता.या वादाच्या अनुषंगाने यापूर्वी न्यायालयीन प्रक्रिया, तहसीलदार स्तरावरील सुनावणी, पोलीस ठाण्यात तक्रारी तसेच उपोषण व आत्मदहनाचे निवेदन देण्यात आले होते. तरीही वाद निकाली निघत नव्हता.दि. २०/०२/२०२६ रोजी तहसीलदार सौदागर तांदळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक उजगरे, पोलीस व महसूल कर्मचारी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व स्थानिक प्रतिष्ठित नागरिक यांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणी करण्यात आली. सुमारे ५ तास सखोल चर्चा करून शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करत रस्ता व नाली तयार करून देण्याचा निर्णय घेण्यात आला.

सर्व संबंधितांच्या संमतीने हा दीर्घकालीन वाद सामंजस्याने मिटविण्यात आला. यामुळे अनेक वर्षांपासून सुरू असलेला वाद संपुष्टात येऊन संबंधित कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला.

या मोहिमेदरम्यान अवघ्या पाच दिवसांत ४९ जमीन व शेती वादांचा सामंजस्याने निपटारा करण्यात आला असून, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले वाद यशस्वीरीत्या मिटविण्यात आले आहेत.

पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर हा उपक्रम केवळ वाद निवारणापुरता मर्यादित नसून, ग्रामीण भागात विश्वास निर्माण करणारा, संवेदनशील व परिणामकारक पोलिसिंगचा आदर्श नमुना ठरत आहे. जमीन व शेतीसंदर्भातील वाद असलेल्या शेतकऱ्यांनी आपल्या संबंधित पोलीस ठाण्याशी संपर्क साधून या उपक्रमाचा लाभ घ्यावा व सामंजस्याच्या माध्यमातून वाद मिटविण्यास पुढाकार घ्यावा, असे आवाहन लातूर पोलीस प्रशासनातर्फे करण्यात येत आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## ट्रम्प माघार घेणार नाहीत, अशा मनस्थितीत!

अमेरिका,ईस्त्राईल मिळून इराणावर हल्ला करीत आहेत. युद्धजन्य स्थितीमुळे जगात चिंता व्यक्त केली जात आहे. युद्धजन्य स्थिती संपली पाहिजे असे जगाला वाटत असले तरी ट्रम्प यांना खुमखुमी असल्याने ते माघार घेण्यात तयार नाहीत. उलट इराणमध्ये सैन्य पाठविणार असल्याचे वक्तव्य केले आहे. जसे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून ट्रम्प यांची दुसऱ्यांदा निवड झाल्यापासून जगात अशांतता निर्माण होत आहे. अमेरिका महासत्ताधिश आहे. त्याच्याकडे मोठी ताकद आहे. सर्वसंपन्न आहे याचा अर्थ लहान राष्ट्राचा छळ करणे हा होत नाही. आज पर्यंत ट्रम्प असो किंवा अमेरिका याने थेट युद्ध केले नाही हा इतिहास आहे. दुसऱ्याच्या खांद्यावर बंदुक ठेवून युद्ध करीत असतात ईतरांना त्रास दिला आहे. युद्धासाठी अमेरिकेची भुमी वापरली नाही तर इतर देशाच्या भुमिचा वापर केला आहे. त्यामुळे आजही तीच परिस्थिती दिसून येत आहे. अमेरिकेला इराणमधील खणीज संपत्ती ताब्यात घ्यावयाची आहे. कच्च्यातेलाचा साठा, तेलाच्या विहीरी कब्जात ठेवायाच्या आहे. जगात तेलसाठे इराणमध्ये आहेत. पाणी नाही मात्र इंधन आहे. ही ईश्वरीय लीला आहे. या जगात कोणत्या भुभागात काय दडले आहे हे केवळ ईश्वराला माहिती आहे. ईराणमध्ये तेलखाणी असल्याने जगाच्या पाठीवर श्रीमंत राष्ट्र आहे. या श्रीमंतीच्या जोरावर सर्व कारभार चालतो. तसा हा ईस्लामिक देश आहे. जगाच्या पाठीवर सर्वाधिक ईस्लामिक देश आहेत. असे जरी असले तरी आज मदतीला एकही ईस्लामिक राष्ट्र पुढे येत नाहीत. युद्ध समाप्त व्हावे म्हणून पुढे येत नाहीत. दहशवाद पसरविणाऱ्यात कोण पुढे आहे. विध्वंसक हत्त्यारे कोणाकडे आहे. आतंगवाद कोण पसरवित आहे. हे जगाला माहिती आहे, असे असले तरी आज अशी परिस्थिती आहे की, कोणीही ईस्लामिकराष्ट्र अमेरिकेला युद्ध थांबवा असे बोलण्याचे धाडस नाहीत. छोटाशा ईराण हा हिंमतीने लढतो आहे. माघार घेत नाही. आज काही प्रमाणात अमेरिकेस जेरीस आणले आहे. अर्धा महिणा होत असताना हिंमतीने लढा देत आहे. महासत्ताधिश असणार अमेरिका हा विचार करून लढत आहे. अमेरिकेला खणीज संपत्ती हवी आहे. इंधनाच्या जोरावर जगावर राज्य करावयाचे हा सरळ असा त्याचा मनसुबा दिसून येत आहे. जागतिक युद्ध भडकू नये याची खबरदारी इतर देश घेत आहेत. युद्ध तसे कोणालाही परवडणारे नाही. आज अमेरिकेला आर्थिकदृष्टया युद्ध परवडणारे नाही हे त्याला ही माहिती आहे. लाखोंचा चुराडा होतो. तसे पाहिले तर अमेरिकेला किती डॉलरचा फटका बसला असेल केवळ विचार केलेला बरा... त्यामुळे युद्ध परवडणारे नाही. इराण हा देखिल जशासतसे उत्तर देत आहे. माघार नाही, आम्ही लढू असे म्हणत आहे. तसे पाहिले तर इराण हा खंडर होत आहे. अनेक इमारती उद्धस्थ झाल्या आहेत. बंकरवर हल्ला केला जात आहे. इराणच्या प्रमुखांना ठार मारले आहे. मंत्र्यांना ठार मारले आहे तरी इराणी जनता लढत आहे. यामागील कारण म्हणजे इराणी जनतेचे इराणावर असलेले राष्ट्रप्रेम आहे हे लक्षात घेतले पाहिजे. चीन व रशिया गप्प आहेत. भारताची भुमिका गप्पच आहे. जागतिक स्तरावर कोणीही नाराजगी ओढावुन घेत नाही ते परवडणारे नाही हे लक्षात घेत आहेत, भारताने आपली चाल योग्य खेळली आहे. काही झाले तरी भारताने युद्ध जन्य स्थितीत गॅसचे दोन जहाज भारतात दाखल झाले आहेत. जीव मुठीत घेवून ती भारतात दाखल झाली आहेत. जसे इराणावर हल्ला करीत आहे तसे आफगाणीस्तान व पाकिस्तान यांच्यात संघर्ष चालू आहे. पाकिस्तान लहान राष्ट्र असल्याने इतर मोठ्या देशाचे लक्ष त्याच्यावर आहे. आज पाकिस्तानची आर्थिकस्थिती खालावली आहे. महागाई वाढली आहे. पाकिस्तानी नागरिक महागाइशी लढता-लढता कठिण जीवन जगत आहेत. अशा स्थितीत आफगाणीस्तानला डवचणे पाकिस्तानला महागात पडू शकते. इराणी सैन्य एका विशेष प्रकारच्या मोझॅक डिफेन्स सिस्टिम अंतर्गत युद्ध लढत आहे. कमांडर-इन-चीफ राहिलेल्या अली जाफरी यांनी २००७ पासून इराणी सैन्यासाठी ही सिस्टिम लागू केली होती. या अंतर्गत इराणी सैन्य कोणत्याही एका केंद्रीकृत कमांडकडून आपले निर्देश घेत नाही. परंतु इराणच्या सर्व ३१ प्रांतांच्या कमांडमध्ये विभागले गेले आहे. प्रत्येक कमांडला हा अधिकार आहे की ते तेहरानकडून परवानगीची वाट पाहण्याऐवजी आपल्या परिसरात सैन्य अभियान चालवू शकतात. ऑस्ट्रेलियाचे विश्लेषक शनाका अंसलेम परेरा म्हणतात, 'इराणची डिफेन्स सिस्टिम आपोआप काम करत आहे. त्याचे मोझॅक तत्त्व इराणचा पराभव अशक्य करण्यासाठी तयार केले गेले आहे. जाफरी यांनी या गोष्टीचा अभ्यास केला होता की केंद्रीकृत सैन्य कसे नष्ट होते. म्हणून त्यांनी असे सैन्य तयार केले जे नष्ट केले जाऊ शकत नाही.' असेही म्हटले जात आहे की लारीजानीसारख्या नेत्यांना मारणे इस्त्रायलसाठी उलट परिणाम करू शकते. १७ मार्चच्या रात्री इराणने इस्त्रायलची राजधानी तेल अवीव, जेरुसलेमसह १०० हून अधिक ठिकाणी क्षेपणास्त्र हल्ला केला. या हल्ल्यात दाट लोकवस्ती असलेल्या भागांनाही लक्ष्य करण्यात आले, ज्यात किमान २ लोकांचा मृत्यू झाला. लारीजानीनंतर इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाघेरी गालिबफ यांच्यासारखे कट्टरपंथी नेते मजबूत होऊ शकतात, जे यापूर्वीचे कमांडर राहिले आहेत. मोसादची अधिकारी राहिलेल्या सायमा शाइन यांच्या मते, हेच लोक प्रत्यक्षात युद्ध चालवत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली आल्याने अधिक मजबूत होईल आणि ते प्रतिहल्ला सुरू ठेवेल. इराण अशा मागण्या करेल, ज्या अमेरिका-इस्त्रायल कोणत्याही परिस्थितीत स्वीकारू शकणार नाहीत.'त्यामुळे जागतिक परिस्थितीचा भारतीयांनी विचार करून वागले पाहिजे. महागाईत वाढ होणार आहे. कच्चे तेल व गॅसचा तुटवडा भासणार आहे. हे ओळखून वागले पाहिजे. आगामी काळात कोणते संकट येईल हे आज सांगता येत नाही. संकट भारतीय नागरिकांवर येवू शकते. थेट युद्धाचे नाही तर युद्धामुळे होणाऱ्या परिणामाचे पडसाद उपटू शकतात. त्यामुळे भारतीयांनी काटकसर करावीच लागेल. अनावश्यक खर्च टाळावा लागेल. अनेक बाबतीत खर्च करताना विचार करावा लागेल. इंधनाचा भडका उडाली की, सर्वच वस्तूच्या दरात वाढ होत असते. हे साधे गणित आहे. त्यामुळे विचारपुर्वक वागणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे ट्रम्प युद्ध विराम देतील असे सध्यालाही वाटत नाही.

# .... आणि ती भुर्रर उडून गेली...!



चिमणी म्हणजेच चिऊताई हिची ओळख पूर्वी बालपणात होत होती. म्हणजे लहान बाळाला भरविताना 'हा घास चिऊचा, हा घास काऊचा,' असे म्हणत. खरोखरच मऊ भाताचा एक घास चिमणीला टाकला जात होता व तीही न घाबरता अगदी जवळ येऊन ते अन्न टिपायची. तिच्या त्या सुंदर हालचाली व मंजुळ चिवचिवाट ऐकत बाळाला भरवणे पूर्ण व्हायचे आणि बालपण समृद्ध व्हायचे; पण आता बघता-बघता विकासाच्या झंझावातात ही चिऊताई आपल्यापासून दूर उडून गेली आहे.

आजकाल पालक लहान बाळाला भरविताना मोबाइलवर अँग्री बर्ड दाखवतात आणि मोठ्या अभिमानाने सांगतात की, हा मोबाइलशिवाय जेवतच नाही. येथून त्या बाळाची आणि मोबाइलची घातक मैत्री होऊन भविष्यातील दुष्टचक्र सुरू होते. त्यासाठी हे थांबविणे गरजेचे आहे.

चिमणी हा आपल्या घराजवळ सहज दिसणारा लहान पक्षी आहे, तिचा चिवचिवाट वातावरणात आनंद निर्माण करतो; परंतु गेल्या काही वर्षांत चिमण्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे, चिमणी सहसा माणसांच्या वस्तीजवळ राहणे पसंत करते. घरांच्या छपरात, भिंतींच्या फटीत किंवा कौलांखाली ती आपले घरटे बांधत असे. पण आजकाल मातीची घरे राहिली नाहीत. तसेच पूर्वी आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे घरे एकाच झटक्यात पूर्ण बांधली जात नव्हती; ती टप्याटप्प्याने बांधली जात होती. अनेक घरांना बाहेरून प्लास्टर होत नसे. भिंतीच्या विटांमध्ये बांबू बांधण्यासाठी ज्या खोबण्या असायच्या, त्यांत चिमणी हमखास घरटे बांधायची. याशिवाय पूर्वी घरातील गरम हवा बाहेर जाण्यासाठी खिडक्यांच्या वर किंवा स्लॅबखाली छोट्या खिडक्या असायच्या. त्या नेहमी उघड्या असायच्या. त्यामधून चिमणी हक्काने घरात येऊन पंख्यावर, ट्युबलाइटवर किंवा कोनाड्यात आपला संसार थाटायची. पण आता आर्थिक सुबत्ता आली आणि घरे एकाच दमात पूर्ण व्हायला लागली. एसी आल्यामुळे छोट्या खिडक्यांची जागा स्लाइडिंग विंडोंने घेतली आणि चिमणीसाठी आपल्या घरात व मनात जागाच राहिली नाही.

चिमण्या धान्याचे दाणे, किडे-मुंग्या आणि छोटे कीटक खातात, त्यामुळे त्या शेतीसाठी खूप उपयुक्त ठरतात. चिमण्यांचे निसर्गात मोठे महत्त्व आहे. त्या कीटक खाऊन पिकांचे संरक्षण करतात. त्यामुळे शेतकऱ्यांना मदत होते. तसेच त्या बियाणे पसरवून नवीन झाडे उगवण्यास मदत करतात. चिमण्यांच्या चिवचिवाटामुळे परिसर आनंदी व जिवंत वाटतो. चीनमध्ये एकदा चिमण्यांबावत घडलेली घटना याचे महत्त्व दाखवून देते. तेथे चिमण्या धान्य खातात म्हणून त्यांचा मोठ्या प्रमाणावर नाश करण्यात आला; परंतु त्यानंतर शेतातील किड्यांची संख्या प्रचंड वाढली आणि पिकांचे मोठे नुकसान झाले. चीनमध्ये अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. नंतर संशोधनातून चिमणीचे महत्त्व लक्षात आल्यावर दुसऱ्या देशातून चिमण्यांची आयात करून त्यांचे संवर्धन केले गेले. चिमणीमुळे पर्यावरणाचे संतुलन राखले जाते. म्हणूनच चिमणी हा निसर्गातील अन्नसाखळीचा एक महत्त्वाचा भाग आहे.



निसर्गातील प्रत्येक जिवाचे महत्त्व अनन्यसाधारण असते, हे लोकांच्या लक्षात आले पाहिजे. निसर्गातील संतुलन टिकवण्यासाठी प्रत्येक जीव आवश्यक असतो. त्यामुळे चिमण्यांचे संवर्धन करणे ही आज काळाची गरज आहे.

यासाठी आपण काही सोप्या उपाययोजना करू शकतो. घराच्या गॅलरीत किंवा अंगणात चिमण्यांसाठी बाराही महिने मातीचे पसरट पाण्याचे भांडे ठेवावे. दर आठवड्याला या भांड्यामधील शेवाळ व कचरा काढून ते स्वच्छ करावे. अंगणातील इंच-इंच जागेचे कॉंक्रीटीकरण करू नये; काही भागांत माती ठेवावी, जेणेकरून चिमणी त्यामध्ये धूळ अंघोळ करू शकेल. घराच्या अंगणात, गॅलरीत, व्हरांड्यात, वॉशिंग स्पेसवरील छपरावर किंवा सोलर पॅनलच्या खालील अँगलवर चिमण्यांसाठी कृत्रिम घरटी लावावीत. घरातील जुने सुतळीचे पोते फाडून त्याचे तुकडे करावेत व त्यातील सुतळी थोडी विरळ करून ती एखाद्या ठिकाणी लटकवून ठेवावी, जेणेकरून तिला घरट्यासाठी साहित्य मिळेल. घराच्या परिसरात बकुळ, तगर, जांभूळ किंवा योगनवेल लावावीत. चिमण्या फांद्या दाट असलेल्या झाडांमध्ये जारत आढळतात. या गोष्टी केल्यास चिमण्यांना सुरक्षित वातावरण मिळू शकते.

आज मोबाइलवर चिमणी संवर्धनाचे अनेक उपाय सांगितलेले आहेत: आता गरज आहे ती फक्त कृती करण्याची.

भविष्यात जर नवीन पिढीला समृद्ध जीवन जगण्यासाठी स्वच्छ हवा व पाणी द्यायचे असेल, तर आज पुन्हा चिमणीला आपल्या अंगणात आणावे लागेल; कारण त्याच चिऊताईच्या माध्यमातून नवीन पिढीची नाळ निसर्गाशी जुळवता येते आणि त्यांच्या मनांमध्ये निसर्गसंवर्धनाच्या संस्कारांचे बीज रुजवता येते. मोबाइलमध्ये मान खाली घालून नाही, तर ताठ मानेने जगण्याचा मार्ग फक्त चिऊताईच दाखवू शकते. तेव्हा या 'चिमणी दिना'ला चिमणी संवर्धनाची कृती करा आणि आपल्या पाल्यांचे भविष्य समृद्ध करा... नाहीतर चिमणीही भुर्रकन नष्ट व्हायला वेळ लागणार नाही....

**अमोल सावंत**
**निसर्ग कट्टा तथा कार्यकारिणी सदस्य,**
**महाराष्ट्र पक्षिमित्र**

# गाळमुक्त धरण–गाळयुक्त शिवार २.० मुळे राज्यात जलसाठा क्षमतेत वाढ

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील उपक्रमाची फलश्रुती



**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यातील जलसुरक्षा बळकट करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार उपक्रमाला राज्यभरात प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. या योजनेमुळे हजारो जलसाठ्यांची क्षमता वाढली आहे. योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात म्हणजे गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार २.० अंतर्गत मोठ्या प्रमाणावर गाळ उपसा करून शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळत आहे.

राज्यातील ३४ जिल्ह्यांमधील सुमारे ३,२६८ जलसाठ्यांमधून आतापर्यंत ७.७३ कोटी घनमीटर इतका गाळ काढण्यात आला आहे. त्यामुळे ७७ लाख पाण्याच्या टँकर इतकी जलसाठवण क्षमता पुनर्संचयित झाली असून ११ हजार ५८३ गावांतील सुमारे १ कोटी ३९ लाख नागरिकांना त्याचा लाभ झाला आहे. सुमारे ६९ हजार शेतकऱ्यांनी गाळ आपल्या शेतात नेला, त्यापैकी ९१ टक्के शेतकरी वंचित घटकांतील आहेत.

२०२५-२६ या आर्थिक वर्षात योजनेला अधिक गती मिळाली असून १,३९८ जलसाठ्यांमधून २.६९ कोटी घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. यामुळे जवळपास २६ हजार शेतकऱ्यांना फायदा झाला. भंडारा आणि जळगाव जिल्ह्यांत अनुक्रमे ३२ लाख आणि १६ लाख घनमीटर गाळ मंजूर करण्यात आला असून मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे ३०० टक्के वाढ झाली आहे.

तसेच गोंदिया आणि गडचिरोलीसारख्या आदिवासी जिल्ह्यांतही योजनेच्या कामांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. राज्यभरातील ४०० पेक्षा अधिक स्वयंसेवी संस्था, ग्रामपंचायती आणि स्थानिक समुदायाच्या सहभागातून ही योजना राबविण्यात येत असून जलसाठे पुनरुज्जीवित करण्यास मदत होत आहे.

राज्यातील बहुतांश शेती पावसावर अवलंबून असल्याने जलसाठा वाढविणे आणि भूजल पुनर्भरण मजबूत करण्यासाठी ही योजना अत्यंत महत्त्वाची ठरत आहे.

संभाव्य एल-निनोच्या पार्श्वभूमीवर जलसुरक्षा बळकट करण्यासाठी या उपक्रमाची अंमलबजावणी शासनाकडून पुढेही सुरू ठेवण्यात येणार आहे.

## युरिक ॲसिडवर रामबाण उपाय! या ३ गोष्टी खा आणि सांध्यांत साचलेले खडे क्षणात होतील गायब

एकदा आपल्या शरीरात युरिक ॲसिड जमा झाले की, अनेक आरोग्य समस्या निर्माण करू शकते. किंवा युरिक ॲसिड वाढल्याने मुतखडा, गाउट(एक प्रकारचा संधिवात) आणि आर्थरायटिस(सांध्यांमध्ये जळजळ, वेदना आणि कडकपणा येणे) सारख्या वेदनादायक समस्या उद्भवू शकतात, ज्या तुम्हाला आयुष्यभर त्रास देऊ शकतात. म्हणून, युरिक ॲसिड नियंत्रित करणे खूप महत्वाचे आहे. 'कपिल त्यागी आयुर्वेद क्लिनिक'चे संचालक कपिल त्यागी यांनी युरिक ॲसिड कमी करण्यासाठी आयुर्वेदिक उपाय सांगितले आहेत, ज्यामुळे ते नियंत्रित होण्यास मदत होऊ शकते.

**युरिक ॲसिड कमी करण्यासाठी ३ गोष्टींचे सेवन करा**

**ओवा**

**अश्वगंधा**

**कडूलिंब**

**ओवा**

ओव्यात दाह विरोधी गुणधर्म असतात जे सूज कमी करतून संधिवाताचा त्रास कमी करता. त्याशिवाय ओव्यात ओमेगा ३ फॅटी ॲसिड भरपूर प्रमाणात असते जे युरिक ॲसिडची पातळी नियंत्रित ठेवतो. तेच युरिक ॲसिड नैसर्गिक रित्या बाहेर पडण्यासाठी मदत करते. युरिक ॲसिडसाठी एक चमचा ओवा एक ग्लास पाणी उकळा आणि दिवसातून दोनदा हे पाणी प्या.

**अश्वगंधा**

अश्वगंधा आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. आयुर्वेदात, अश्वगंधा एक शक्तिशाली औषधी वनस्पती मानली जाते जी शरीरातील जळजळ आणि वेदना कमी करण्यास मदत करते. युरिक ॲसिड नियंत्रित करण्यासाठी आणि सांधेदुखी कमी करण्यासाठी देखील ती फायदेशीर आहे. एक ग्लास कोमट पाण्यात किंवा दुधात एक चमचा अश्वगंधा पावडर मिसळा आणि दिवसातून एकदा प्या. यामुळे आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण फायदे मिळतील.

**कडूलिंब**

कडुलिंबामध्ये अनेक औषधी गुणधर्म आहेत. कडुलिंब केवळ युरिक ॲसिडसाठीच फायदेशीर नाही तर ते अनेक आजारांवर देखील उपचार करते. कडुलिंबामध्ये दाहक-विरोधी गुणधर्म भरपूर असतात, ज्यामुळे ते संधिवातावर उपचार करण्यासाठी फायदेशीर ठरते. प्रभावित भागात कडुलिंबाची पेस्ट लावल्याने वेदना आणि सूज कमी होते. यामुळे लक्षणीय आराम मिळेल.

**ॲपल साईडर व्हिनेगर**

युरिक ॲसिड कमी करण्यासाठी ॲपल सायडर व्हिनेगर अत्यंत प्रभावी मानले जाते. त्यात असलेले मॅलिक ॲसिड युरिक ॲसिड विरघळण्यास मदत करते, ज्यामुळे ते शरीरातून बाहेर पडते. एका ग्लास कोमट पाण्यात १-२ चमचे ॲपल सायडर व्हिनेगर मिसळा. ॲपल सायडर व्हिनेगर पचनासाठी देखील चांगले आहे.

**युरिक ॲसिड म्हणजे काय?**

खरं तर, आपण जे अन्न खातो त्यात प्युरिन नावाचे रसायन असते, जे युरिक ॲसिड तयार करते, जे लघवीद्वारे बाहेर टाकले जाते. जेव्हा शरीरात प्युरिनचे चयापचय योग्यरित्या होत नाही, तेव्हा युरिक ॲसिडची पातळी वाढते. शरीरातून बाहेर पडण्याऐवजी, हे ॲसिड सांध्यामध्ये जमा होऊ लागते, ज्यामुळे वेदना, सूज आणि संधिवात सारख्या समस्या उद्भवतात. अशा परिस्थितीत, आपण आपल्या आहाराबद्दल विशेष काळजी घेतली पाहिजे, कारण अनेक पदार्थ आणि पेयांमध्ये प्युरिन आढळतात.

## ढाब्याची चव मिळवा घरीच , बनवा पनीर दो प्याजा; नोट करा झटपट होणारी रेसिपी

पनीर म्हणजे व्हेज खाणाऱ्या लोकांनासाठी महत्त्वपूर्ण पदार्थ आहे. पनीर प्रोटीनचा एक उत्तम पर्याय आहे. पनीरपासून अनेक डीशेस बनवल्या जातात. मटर-पनीर, पनीर मखनी, पनीर लबाबदार अशा भाज्या तर आपण नेहमीच खातो. पण नेहमीच तेच तेच पदार्थ खाऊन कंटाळा येतो. मग अशावेळी नवीन काही तरी खाण्याचा शोध घेतला जातो. यामुळेच आम्ही आज तुमच्यासाठी ढाबा स्टाईल पनीर दो प्याजाची रेसिपी घेऊन आलो आहोत. चला तर मग याची सोपी रेसिपी जाणून घेऊयात.

लागणारे साहित्य (२-३ लोकांसाठी)
पनीर – २०० ग्रॅम (चौरस किंवा लांबट तुकडे)
कांदे – २ मोठे (स्लाइस किंवा मोठे चोप करून)
टोमॅटो – १ मोठा (बारीक चोप करून)
हिरवी मिरची – २–३ (चिरून)
आले-लसूण पेस्ट – १ चमचा
हळद – ॽ चमचा
लाल तिखट – १ चमचा
धने पावडर – १ चमचा
जिरं पावडर – ॽ चमचा
गरम मसाला – ॽ चमचा
क्रीमदही – २–३ चमचे (ऐच्छिक)
मीठ – चवीप्रमाणे
तेलतूप – २–३ चमचे
कोथिंबीर – सजावटीसाठी

कसं बनवायचं पनीर दो प्याजा?

एका कढईत तेल गरम करा. त्यात कांद्याचे १३ भाग टाकून छान सोनेरी आणि मऊ होईपर्यंत परतून घ्या. उरलेले कांदे स त्र्री त्र्री करायचे आहेत.

तूप किंवा तेलात आले-लसूण पेस्ट घालून १–२ मिनिट परतून घ्या. नंतर हळद, लाल तिखट, धने पावडर, जिरं पावडर घालून चांगले मिक्स करा.

बारीक चिरलेले टोमॅटो व हिरवी मिरची घालून ५–७ मिनिट शिजवा, जोपर्यंत तेल मसाल्यातून सुटत नाही.

मसाल्यात पनीरचे तुकडे घालून २–३ मिनिट हलके हलके परतून घ्या.

आधी सोनेरी केलेले कांदे आता मिश्रणात घालून १–२ मिनिट हलके परतून घ्या.

जर थोडी क्रीमी टेक्सचर हवी असेल, तर थोडी क्रीम किंवा फेटलेले दही घालून २ मिनिट शिजवा.

शेवटी गरम मसाला टाकून १ मिनिट शिजवा. वरून कोथिंबीर टाकून सर्व्ह करा.

'या' सर्व्हिंग टिप्स फॉलो करा

पनीर दो प्याजासोबत मस्त गरम भाकरी, नान किंवा जिरे राईससोबत सर्व्ह करा.

कांद्याची चव अधिक हवी असेल तर कांद्याचे तुकडे मोठे ठेवा.



# पर्यटकांनी बांगलादेशाकडे असुरक्षेमुळे फिरवली पाठ

बांगलादेश नॅशनॅलिस्ट पक्षाचे नेते तारिक रहमान पंतप्रधान झाल्यानंतर भारतासोबत संबंध सुधारण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे, परंतु गेल्या काही काळापासून दोन्ही देशांमधील संबंध तणावपूर्ण राहिले आहेत. बांगलादेशमध्ये ऑगस्ट २०२४ पासून राजकीय अस्थिरतेचे वातावरण आहे. विद्यार्थी आंदोलन, शेख हसीना यांच्या राजीनाम्याची मागणी, त्यांच्याविरोधातील आंदोलन, अंतरिम सरकारची स्थापना आणि अल्पसंख्याकांवरील सातत्याने होणारे हिंसक हल्ले या सर्व घटनांमुळे देशात अस्थिरता निर्माण झाली. याचा थेट परिणाम परदेशी पर्यटकांच्या संख्येवर झाला आहे.

२०२५ मध्ये बांगलादेशमध्ये येणार्या परदेशी पर्यटकांच्या संख्येत नऊ टक्क्यांहून अधिक घट झाली. विशेषतः भारतातून येणार्या पर्यटकांची संख्या तब्बल ७३ टक्क्यांनी घटली आहे. अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने व्हिसासंदर्भात निर्बंध लावले असून त्याचा पर्यटनक्षेत्रावर परिणाम झाला आहे.

'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'च्या २०२४ च्या 'ट्रॅव्हल अँड टुरिझम डेव्हलपमेंट इंडेक्स'नुसार ११९ देशांच्या यादीत बांगलादेश १०९ व्या क्रमांकावर आहे. तो आशिया-पॅसिफिक प्रदेशातील सर्वांत खालचा क्रमांक आहे. बांगलादेशच्या 'जीडीपी' मध्ये पर्यटनाचा वाटा सुमारे ३.०२ टक्के असल्याने हा आकडा महत्त्वाचा मानला जातो.

पर्यटनक्षेत्र बळकट करण्यासाठी आणि रोजगार वाढवण्यासाठी सरकारने पर्यटन बारा उपक्षेत्रांमध्ये विभागले आहे. यात हॉटेल्ससोबत कॅफे, रिसॉर्ट्स, क्रूझ शिप, एअरलाईन्स, ट्रॅव्हल एजन्सी, संग्रहालये, हस्तकला उद्योग इत्यादी क्षेत्रांचा समावेश आहे. त्यामुळे ड्रायव्हरपासून स्वयंपाकी आणि कारागिरांपर्यंत सर्वांना रोजगार मिळतो. २०२४ मध्ये पर्यटनक्षेत्राला बसलेल्या फटक्यामुळे बांगलादेशच्या परकीय उत्पन्नात मोठी घट झाली. २०२४ मध्ये देशाला सुमारे १३ दशलक्ष डॉलर्स (शंभर कोटी रुपयांहून अधिक) इतका तोटा सहन करावा लागला.

२०२५ मध्ये परदेशात प्रवास करणार्या भारतीयांची संख्या ६.६ टक्क्यांनी वाढून विक्रमी ३.३ कोटींवर पोहोचली, मात्र सौदी अरेबिया आणि अमेरिकेत जाणार्यांची संख्या घटली आहे. कॅनडात जाणार्या भारतीयांची संख्या सुमारे १६ टक्क्यांनी कमी होऊन आठ लाखांवर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार 'नॉन-पीक सीझन'मध्ये देशांतर्गत विमानभाडे परवडणारे असले तरी हॉटेल्स महाग असल्यामुळे भारतीय मध्यमवर्ग आता गोवा किंवा केरळऐवजी संयुक्त अरब अमिराती, श्रीलंका, थायलंड, व्हिएतनाम आणि मलेशिया यांसारख्या देशांमध्ये जाणे पसंत करत आहे.

# आपल्या गॅसची बचत करा, उकळी येताच गॅस कमी करा

सध्या आखाती देशांमध्ये सुरु असलेल्या युद्धामुळे डझञ चा पुरवठा प्रभावित झाला आहे. भारत आपल्या डझञ च्या मोठ्या भागासाठी मध्यपूर्वेवर अवलंबून आहे. युद्धामुळे जहाज वाहतुकीत अडथळा निर्माण होत-ो, इंधनाचे महागाई वाढते आणि घरगुती उपलब्धतेवर तणाव येतो. या परिस्थितीत काही ठिकाणी डझञ मिळवणे कठीण झाले आहे, तर सिलेंडरच्या किमतीही वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर घरगुती बचत आणि गॅस वापरा-तील काही चांगल्या महत्त्वाच्या ठरतात. इंडियन ऑइल या कंपनीने काही सोप्या टिप्स शेअर केल्या आहेत.



उकळी लागल्यानंतरही जास्त आचेवर ठेवण्याने अन्न पटकन शिजवते, पण खरेतर त्याने फक्त गॅस जास्त खर्च होतो. मंद आचेवर शिजविल्यास डझञ चा वापर अंदाजे २५ टक्क्यांपर्यंत कमी होतो, आणि अन्न व्यवस्थित शिजते.

डझञ वापराचे आर्थिक आणि पर्यावरणीय फायदे

डझञ वापरातील बचत फक्त आर्थिक दृष्ट्या फायदेशीर नाही, तर पर्यावरणाच्या दृष्टीनेही महत्त्व-ाची आहे. कमी गॅस वापरल्याने जळणातून निर्माण होणारी हानिकारक वायूंची मात्रा कमी होते. यामुळे प्रदूषण कमी होते आणि घरातील हवेचा दर्जाही सुधारतो. याशिवाय, घरगुती खर्चात बचत केल्यास कुटुंबातील इतर गरजांसाठी आर्थिक संसाधने उपलब्ध होतात. विशेषतः आजच्या परिस्थितीत, जेव्हा डझञ ची किंमत वाढली आहे, अशा सवयी घरगुती गॅस सिलेंडरचे आर्थिक व्यवस्थापनासाठी उपयुक्त ठरतात.

# मासिक पाळी न आल्यास काय करावे? संपूर्ण मार्गदर्शक

मासिक पाळी नियमित असणे हे स्त्रीच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. मासिक पाळी विलंबाने येणे किंवा पूर्णपणे बंद होणे ही चिंता वाढवणारी बाब ठरू शकते. अनेक महिलांना हा अनुभव येतो, आणि याची कारणे विविध असू शकतात - हार्मोन्समधील असंतुलन, आहारातील बदल, मानसिक तणाव, किंवा वैद्यकीय समस्या. काहीवेळा ही तात्पुरती समस्या असते, पण काहीवेळा यामागे गंभीर आरोग्यविषयक कारणे असू शकतात.या लेखात आपण मासिक पाळी न आल्यास काय करावे, त्यामागची कारणे, उपाय, आणि डॉक्टरांचा सल्ला कधी घ्यावा याविषयी सविस्तर माहिती घेऊ. मासिक पाळी न येण्याची कारणे १. गरोदरपणा

जर मासिक पाळी नसेल आली आणि तुम्ही लैंगिक संबंध ठेवले असतील, तर गर्भधारणेची शक्यता तपासणे गरजेचे आहे. यासाठी

**(क्रमशः उद्याच्या अंकात)**





## पोहे खाण्याचे फायदे जाणून घ्या, मुलांच्या आहारात समाविष्ट करा

:पोहे शरीरासाठी फायदेशीर मानले जातात. ते मऊ असल्याने लहान मुले सहज खाऊ शकतात. पौष्टिकतेने भरपूर असण्यासोबतच ते सहज पचते. पोहे अनेक प्रकारच्या पोषकतत्वांनी समृद्ध आहे. पोटॅशियम, फायबर, प्रथिने आणि सोडियम इत्यादी चांगल्या प्रमाणात आढळतात. याच्या सेवनाने मुलाचे पोट तर चांगलेच भरते, पण त्याच्या शरीराला शक्तीही मिळते. पोह्याचे सेवन केल्याने मुलांना बद्धकोष्ठता आणि गॅससारख्या समस्यांपासून आराम मिळतो.

मुलांच्या आहारात पोहे समाविष्ट करा. त्याचे फायदे जाणून घ्या. पचनसंस्थेसाठी फायदेशीर-पोहे मुलांची पचनसंस्था निरोगी ठेवण्यास मदत करतात. पोह्यातील फायबरमुळे बद्धकोष्ठतेची समस्या कमी होते आणि मल मऊ होतो. शिवाय, ते सहज पचते आणि मुलांची पचनसंस्था निरोगी ठेवते. पोह्याचे सेवन केल्याने मुलांचे पोट हलके राहते.प्रथिनांच्या कमतरतेवर मात करण्यासाठी हे टिप्स अवलंबवाशारीरिक दुर्बलता दूर करते-पोह्याचे सेवन केल्याने मुलांच्या शरीरातील कमजोरी दूर होऊन त्यांना शक्ती मिळते. पोह्यात भरपूर लोह असते. जे लहान मुलांना ॲनिमियासारख्या आजारांपासून दूर ठेवण्यास उपयुक्त आहे. याशिवाय मुलांच्या शरीरातील हिमोग्लोबिनची पातळीही राखतेग्लूटेन मुक्त असते-तुम्हालाही तुमच्या मुलाला ग्लूटेन फ्री फूड खायला द्यायचे असेल, तर तुम्ही तुमच्या मुलाच्या आहारात पोहे जरूर समाविष्ट करा. त्यात ग्लूटेनचे प्रमाण खूपच कमी असते. त्यामुळे मुलांना फूड ॲलर्जी होण्याची शक्यता खूपच कमी असते. उन्हाळ्यात तुमच्या आरोग्यासाठी कोणत्या भाज्या सर्वोत्तम आहेत जाणून घ्या रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होईल.

# वांगचुक यांची अखेर सुटका

वांगचुक यांचे वर्तन मोदी सरकारला 'प्रक्षोभक 'वाटले मात्र संघ परिवारातील अनेकजण विद्वेषी विधाने करतात त्याचे काय? वांगचुक यांची अटक न्यायालय बेकायदा ठरवणार हे उमजल्याने सरकारला माघार घ्यावी लागली.

ज्येष्ठ पर्यावरणवादी कार्यकर्ते, वैज्ञानिक सोनम वांगचुक यांची तुरुंगातून सुटका झाली आहे. राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली त्यांना गेल्या २६ सप्टेंबर रोजी अटक करण्यात आली होती. त्यांच्या विरुद्धची त्या कायद्याखालील कारवाई रद्द केल्याचे केंद्र सरकारने जाहीर केले. त्या नंतर वांगचुक जोधपूरच्या तुरुंगातून बाहेर पडले. लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा मिळावा या मागणीसाठी वांगचुक शांततामय मार्गाने आंदोलन करत होते, मात्र काही कारणाने ते हिंसक बनले. वांगचुक यांनीच 'हिंसाचाराला उत्तेजन दिले' या आरोपा खाली केंद्र सरकारने त्यांना 'राष्ट्रीय सुरक्षा कायदा' या कठोर कायद्याखाली ताब्यात घेतले. 'देशाचे संरक्षण किंवा परदेशांबरोबरचे संबंध किंवा देशाची सुरक्षा यांना बाधा निर्माण करणार्या व्यक्तीस' ताब्यात घेण्याचे-अटक करण्याचे- अधिकार केंद्र सरकारला या कायद्याने मिळाले आहेत. १७० दिवस किंवा सुमारे सहा महिने वांगचुक यांनी तुरुंगवास भोगल्यानंतर त्यांच्या बाबतीत हा कायदा वापरण्याची गरज नसल्याची 'उपरती' केंद्र सरकारला झालेली दिसते. वांगचुक यांच्या अटकेच्या संदर्भात अंतिम सुनावणी गेल्या दि.१७ रोजी होणार होती. त्या आधी दोनच दिवस त्यांच्याविरुद्धची कारवाई केंद्राने मागे घेतली. यामुळे वांगचुक यांना अटक करण्यामागच्या सरकारच्या हेतूविषयी शंका निर्माण होते.

आवाज 'दडपण्याचा' प्रयत्न


वांगचुक यांना झालेली अटक चुकीची होती असे मत अनेकांनी व्यक्त केले होते. त्यांच्या पत्नी गीतांजली यांनी सर्वोच्च न्यायालयात गेल्या ३ ऑक्टोबर रोजी



'हेबिअस कॉर्पस' अर्ज दाखल केला होता. एखाद्या व्यक्तीची अटक कायदेशीर आहे किंवा नाही हे ठरवण्यासाठी त्या व्यक्तीस न्यायाधीशांसमोर आणणे, असा 'हेबिअस कॉर्पस' चा कायदेशीर अर्थ आहे. त्या व्यक्तीचा देह (कॉर्पस) समोर आणणे हा शब्दश: अर्थ आहे. थोडक्यात, अटकेतील व्यक्तीस न्यायालयात आणणे असा त्याचा व्यावहारिक अर्थ आहे. असा अर्ज करणे हा घटनात्मक हक्क आहे. या अर्जावरील सुनावणीत, जर त्या व्यक्तीस झालेली अटक समर्थनीय नसेल म्हणजेच 'बेकायदा' असेल तर न्यायालय त्या व्यक्तीच्या त्वरित सुटकेचा आदेश देते. याची जाणीव झाल्याने केंद्राने कारवाई रद्द केली. त्या वरून वांगचुक यांना अटक करणे हे बेकायदा कृत्य होते हेही सिद्ध होते. मोदी सरकारने जम्मू-काश्मीरचे विभाजन करताना लडाख केंद्रशासित प्रदेश जाहीर केला. मात्र तेथे विधिमंडळ नाही. विधानसभा असल्याखेरीज त्या भागातील जनतेस प्रतिनिधित्व मिळणे शक्य नसते. या भागाचा कारभार थेट केंद्र सरकार चालवते. लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा द्यावा, तेथील सांस्कृतिक व नैसर्गिक संपदेचे रक्षण करण्यास लडाखचा समावेश सहाव्या परिशिष्टात करावा या वांगचुक यांच्या प्रमुख मागण्या आहेत. त्या प्रदेशातील 'अॅपेक्स बॉडी लेह' व 'कारगिल डेमोक्रॅटिक अलायन्स' या संघटनांनीही त्याच मागण्या केल्या आहेत. लडाखला लोकशाही अधिकार मिळावेत या मागणीत गैर काय आहे? त्याबद्दल वांगचुक यांच्या विरुद्ध राष्ट्रीय सुरक्षा कायद्याचा वापर करणे धक्कादायक आहे. अटक केलेल्या व्यक्तीस चोवीस तासांत न्यायालयासमोर हजर करण्याचा त्याचा हक्क हा कायदा काढून घेतो. जामीन मागण्याची परवानगीही हा कायदा देत नाही. ज्याच्या कार्याचा गौरव रॅमन मॅगसेसे पारितोषिकाने झाला आहे अशी व्यक्ती देशाच्या सुरक्षेस धोका असल्याचे मोदी सरकारला का वाटले? वांगचुक यांचे परकीय शक्तींशी संबंध आहेत व त्यांचे वागणे देशहितविरोधी असल्याचा आरोप भाजपच्या नेत्यांनी केला होता. आपल्या विरोधात बोलणे, मत व्यक्त करणे केंद्र सरकारला खपत नाही हे या घटनेने पुन्हा दिसले. या कायद्याचा वापर जपून करावा असे मत सर्वोच्च न्यायालयाने पूर्वी व्यक्त केले आहे; पण आपल्याला विरोध होत असल्याचा संशय जरी आला तरी मोदी सरकार असे कठोर कायदे पत्रकार, चळवळीतील कार्यकर्ते यांना 'गप्प' करण्यासाठी वापरते. ३७० वे कलम रद्द करण्याचे स्वागत करणार्या वांगचुक यांनी आपल्या प्रदेशातील जनतेच्या भावना व्यक्त केल्या, त्याबद्दल त्यांना 'शिक्षा' दिली गेली.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा

अक्रोडामध्ये जीवनसत्वे, क्षार, मोनोअनसॅच्युरेटेड फॅटस मुबलक मात्रेमध्ये असल्याने याचे सेवन मेंदूच्या आरोग्याला पूरक आहे. अक्रोडाच्या नियमित सेवनाने स्मृतीभ्रंशासारखे विकार टाळता येऊ शकतात. मासे, कडधान्ये, आणि पालेभाज्यांमध्ये क्षार आणि जीवनसत्वे मोठ्या प्रमाणांत असल्याने यांच्या सेवनाने वार्धक्यकाळी उद्भवणारा स्मृतीभ्रंश टाळता येऊ शकतो. आयुर्वेदाच्या अनुसार ब्राह्मी ही औषधी मेंदूसाठी टॉनिकचे काम करते. त्यामुळे केसांना लावण्याच्या तेलामध्ये याचा वापरही बुद्धीवर्धनासाठी केला जाण्याची परंपरा प्राचीन काळापासून रूढ आहे.




## २ Joke — विनोद




रुग्ण : माफ करा डॉक्टर, तुम्हाला अपरात्री येण्याची तसदी दिल्याबद्दल.
डॉक्टर : तसं काही नाही. तुमच्याच शेजारी पलीकडे एक रुग्ण आहे. त्यालाही पहायला यायचंच होतं; म्हटलं एका दगडात दोन पक्षी मारता येतील!

## ३ Message — संदेश



goror to hona tha tujhe
hmari shiddat dek kar.
maagar wo apni kadar
ki soch me humari
kimat bhol gain.

## ४ Thought — सुविचार




या विश्वाविषयक सर्वात अनाकलनीय गोष्ट ही आहे की हे विश्व काही प्रमाणात का होईना पण आकलनीय आहे.
- अल्बर्ट आइनस्टाइन

**संस्कृत सुभाषित**

**विद्वत्वं दक्षता शीलं संस्कारान्तिरनुशीलम् ।**
**शिक्षकस्य गुणाः सप्त सचेत्सत्वंप्रसन्नता ।**

अर्थ - विद्वत्ता, दक्षता, चारित्र्य शील, संस्कार, करण्याची क्षमता, दयाळूपणा, चैतन्य आणि प्रसन्नता असे ते सात गुण आहे. आदर्श शिक्षकाच्या ठिकाणी आवश्यक असणारे गुण.

# मनोरंजक महाशब्दकोडे



**आडवे शब्द**

१.जसा राजा तशीच त्याची प्रजा असते या अर्थी एक म्हण
६.संगर,काला
१०.नवरा मुलगा
११.शहर
१२.पोळया भाजण्याचे साधन
१३.शिजवलेली दाळ
१५.साम्यता,असमानताच्या विरूध्द
१७.कपाळ,ललाट
१८.फळातील द्रव
१९.'-- पुरता मामा' एक म्हण
२०.कागद फाटण्याचा आवाज
२१.सावध,दक्ष
२२.आण,कसम मराठीत
२४.खराब उलटा करा
२७.सरळ,तडक
२८.बाण,शर
२९.हृदय
३०.उपयोग
३२.हिरकणीचा उपयोग ही कापण्यासाठी होतो
३४.कावळयाचा रंग
३५.भार,ओझे
३६.अटीतटीची भाशा
३७.केस काळे करण्याचे साधन
३८.नकली,बनवलेला
३९अ.इंग्रजीत चावी
४०.वडीलांचा भाऊ
४१.दुसऱ्याच्या शरीरात प्रवेश करणे
४४.पहाटे आरवणारा प्राणी,कॉक मराठीत
४६.सुगंध,दरवळ
४८.एक लिपी
४९.मासा पकडण्याचा आकडा
५१.शिवाय,म्हैस
५२.भेट,संगम
५३.सापाने टाकलेली त्वचा
५४.हार,सर
५५.भिंतीवर सरपटणारा सरडयाच्या जातीचा एक प्राणी
५६.प्रजा,जन
५७.वासना,इच्छा
६०.घुसणे,प्रवेश करणे
६२.एक फुल झाड
६३.खाली,रिक्त
६४.फटाक्यांची माळ
६५.योग्य,सुरळीत
६६.एक काटेरी फळ
६९.उणीव,ददात
७२.लकाकी,चमक
७३.पवन,वात
७५.मादीचा जोडीदार
७६.थापा मारणारा
७७.चोप,ताडण
७८.सडेतोड,सणसणीत

**उभे शब्द**

१.वेळ मिळेल तसा,सवडीप्रमाणे
२.सिता हरण करणारा राक्षस
३.परस्त्रिशी संग ठेवणारा
४.डामडौल,ऐट
५.माहीतगार,ज्ञात असलेला
६.उन्हाळयातील लिंबु पाणी पेय
७.गोड बोलणारा,भाशण करणारा
८.प्रश्न हिंदीत
९.खरडुन पूसून,भेदभाव न करता
१४.लक्ष्मीपती,विस्णु
१५.वरचढ,डोईजड
१६.नराचा बळी
१८.रात्री बाहेर फिरायला निघणारा
२३.भितीने होणारा शरीराचा कंप
२५.राजकिर्द,सत्तेचा कालावधी
२६.एक सरपटणारा प्राणी
२९.इच्छा,वासना
३०.स्त्रीया संक्रांतीला हे देतात
३१.धुळकण
३२.ऐन तिन्ही सांजेची वेळ
३३.घराबाहेर न निघुन कुणासोबत ही न मिसळणारा
३८.भिमाने वध केलेला एक खादाड राक्षस
३९.घर,भवन हिंदीत
४१.दुसऱ्यांवर उपकार करणारा
४२.एक विदेशी मदय प्रकार
४३.विकास झालेला,विकसनशील
४५.उपेक्षा करणे,अनादर करणे
४७.हे म्हणजे ते व ते म्हणजे हे
५०.तळे,सरोवर
५४.मालवणी भोशत मला
५५.स्वयंपाक शास्त्र
५८.एकोणचाळीस उभेचे उत्तर पहा
५९.अभंगातील नामदेव महाराज
६१.रडुन सांगीतलेली कथा
६६.मुसलमानी भिक्षुक
६७.एक अधिक पाव
६८.'देवाची --- अन नारळात पाणी'
७०.ग्रामिण स्वप्न
७१.नेहमी रडणारा
७२.खंदक,खाण
७४.रक्षा,राखुंड
७५.बोटाच्या अग्रभागावरील कठीण आवरण

**आडवे उत्तर**

१.यथा राजा तथा प्रजा ६.सरमिसळ १०.वर ११.नगर १२.तवा १३.वरण १५.समानता १७.भाल १८.रस १९.कामा २०.टरटर २१.सजग २२.शपथ २४.बराख २७.नीट २८.तीर २९.काळीज ३०.वापर ३२.काच ३४.काळा ३५.वजन ३६.जरतर ३७.कलप ३८.बनावट ३९अ.की ४०.काका ४१.परकायाप्रवेश ४४.कोंबडा ४६.सुवास ४८.रोमण ४९.गळ ५१.वगार ५२.मिलाप ५३.कात ५४.माला ५५.पाल ५६.लोक ५७.कामना ६०.शिरकाव ६२.कणेर ६४.लड ६५.ठिक ६६.फणस ६९.कसर ७२.चकाकी ७३.वारा ७५.नर ७६.थापाडया ७७.मार ७८.खणखणीत

**उभे उत्तर**

१.यथावकाश २.मारीच ३.जार ४.थाटमाट ५.जाणता ६.सरबत ७.मितभाशी ८.सवाल ९.सरसगट १४.रमापती १५.सरस १६.नरबळी १८.रजनीचर २३.थरकाप २५.राजवट २६.साप २९.कामना ३०.वाण ३१.रज ३२.कातर वेळ ३३.एकलकोंडा ३८.बकासुर ३९.मकान ४१.परोपकारी ४२.रम ४३.प्रगतशील ४५.डावलणे ४७.समीकरण ५०.तलाव ५४.माका ५५.पाककला ५८.मकान ५९.नामा ६१.रडकथा ६६.फकीर ६७.सवा ६८.करणी ७०.सपान ७१.रडया ७२.चर ७४.राख ७५.नख




## थोडक्यात/ संक्षिप्त

### उस्मान ख्वाजा तिसऱ्यांदा झाला बाबा; खास पोस्ट

**मुंबई** –ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर फलंदाज



उस्मान ख्वाजाने काही दिवसांपूर्वीच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. सध्या तो टी – २० लीग स्पर्धा खेळताना दिसून येत आहे. मात्र यावेळी तो क्रिकेटमुळे नव्हे, तर वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आला आहे. उस्मान ख्वाजाच्या घरी नव्या पाहुण्याचे आगमन झाले आहे. त्याची पत्नी रचेल मेक्कमेलनने गेल्या आठवड्यात मुलीला जन्म दिला आहे. उस्मान ख्वाजाने इंस्टाग्रामवर पोस्ट शेअर करून ही गोड बातमी दिली आहे. त्याने पोस्टमध्ये आपल्या मुलीचे नाव देखील सांगितले आहे. यासह त्याने या पोस्टला हटके कॅप्शन दिले आहे. त्यामुळे ही पोस्ट सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे.उस्मान ख्वाजाने तिसऱ्यांदा वडील झाल्याच्या आनंदाची बातमी देणारी एक पोस्ट आपल्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवरून शेअर केली आहे. व्हायरल होत असलेल्या फोटोमध्ये तो आपल्या पत्नी आणि ३ मुलींसह असल्याचे दिसून येत आहे. या पोस्टला कॅप्शन देत त्याने लिहिले की, मफ३ पैकी ३..अमीरा माया ख्वाजाचा जन्म गेल्या शुक्रवारी झाला. आम्ही खूप कृतज्ञ आहोत. आणखी एक गोंडस मुलगी. संपूर्ण टीम तयार करण्यासाठी अजून ८ हवे आहेत.

### ईशान किशन आणि अभिषेक शर्मावर हैदराबाद संघाने टाकली मोठी जबाबदारी

**मुंबई**–इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२६ च्या आधी, सनरायझर्स हैदराबादने एक मोठा निर्णय घेतला आहे. भारताच्या नुकत्याच झालेल्या टी–२० विश्वचषक विजयात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या युवा फलंदाज ईशान किशनची संघाने कर्णधार म्हणून नियुक्ती केली आहे. त्यामुळे पॅट कमिन्सच्या जागी ईशान किशन संघाचं नेतृत्त्व करणार आहे. तर अभिषेख शर्मा यांची उपकर्णधार पदासाठी नियुक्ती करण्यात आली आहे.दुखापतीमुळे पॅट कमिन्स हंगामातील सुरुवातीचे काही सामने खेळू शकणार नाही. तो परत येईपर्यंत ईशान किशन संघाचं नेतृत्व करणार आहे.सनरायझर्स हैदराबाद फ्रँचायझीने आपल्या इंस्टाग्राम अकाउंटवर पोस्ट केले, मफ्पॅट कमिन्स दुखापतीतून सावरत आहे आणि हंगामाच्या सुरुवातीच्या सामन्यांमध्ये खेळू शकणार नाही. तो बरा होईपर्यंत, ईशान किशन संघाचे नेतृत्व करेल आणि अभिषेक शर्मा उपकर्णधार असेल. ईशानने या हंगामात झारखंडला सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी जिंकून दिली. त्याने संपूर्ण हंगामात दमदार खेळ केला आणि याच कामगिरीमुळे त्याचे भारतीय संघात पुनरागमन झाले.


### तेंडुलकर, सूर्यकुमार आणि अजिंक्य रहाणेने यांच्यासह अनेक खेळाडूंनी दिल्या गुढीपाडव्याच्या शुभेच्छा

**मुंबई**–गॉड ऑफ क्रिकेट सचिन तेंडुलकर, नुकताच भारताला टी–२० विश्वचषक जिंकून देणारा सूर्यकुमार यादव, माजी फिरकी गोलंदाज हरभजन सिंह, बीसीसीआयचे 'क्रिकेट ऑफ एक्सलन्स'चे प्रमुख आणि माजी फलंदाज व्हीव्हीएस लक्ष्मण, माजी फिरकी गोलंदाज अनिल कुंबळे आणि अजिंक्य रहाणे यांनी सोशल मीडियाद्वारे देशवासियांना गुढीपाडवा आणि उगादीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. सचिन तेंडुलकरने आपल्या एक्स अकाउंटवर लिहिले, ''तुम्हाला व कुटूंबीयांना, गुढीपाडवा व मराठी नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छाष्ठ हे नववर्ष, आनंद, सुख, समृद्धीचे जावो, हीच प्रार्थना करतो.'' सूर्यकुमार यादवने लिहिले, ''नव्या स्वप्नांसह एका नव्या सुरुवातीचे स्वागत करा. सर्वांना गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा.''अजिंक्य रहाणेने आपल्या पोस्टमध्ये लिहिले, ''गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा. हे नवीन वर्ष तुमच्या आयुष्यात आनंद आणि यश घेऊन येवो.'' अनिल कुंबळे यांनी लिहिले.

# २०२८ च्या जागतिक इनडोअर ॲथलेटिक्स स्पर्धा भारतात

**भारताला २०२८च्या जागतिक इनडोअर अजिंक्यपद ॲथलेटिक्स स्पर्धेच्या यजमानपदाचा मान मिळाला**






**नवी दिल्ली :** भारताला २०२८च्या जागतिक इनडोअर अजिंक्यपद ॲथलेटिक्स स्पर्धेच्या यजमानपदाचा मान मिळाला आहे. पोलंड येथे गुरुवारी झालेल्या जागतिक ॲथलेटिक्स परिषदेच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. ही स्पर्धा भुवनेश्वर येथे होईल.

''भारताला २०२८ मध्ये होणार्या जागतिक इनडोअर ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेचे यजमानपद सोपविण्यात आले आहे,'' असे जागतिक ॲथलेटिक्सचे उपाध्यक्ष आदिल सुमारीवाला यांनी सांगिले. भारतीय ॲथलेटिक्स महासंघाने या वर्षाच्या सुरुवातीला जागतिक इनडोअर अजिंक्यपद स्पर्धेसाठी आपली दावेदारी उपस्थित केली होती. जानेवारीमध्ये जागतिक ॲथलेटिक्सच्या दोन सदस्यीय पथकाने भुवनेश्वरच्या कलिंगा स्टेडियम परिसरातील अत्याधुनिक इनडोअर सुविधांची पाहणी केली होती.पोलंडच्या तोरून येथे यंदाची जागतिक इनडोअर ॲथलेटिक्स स्पर्धा सुरू होण्यापूर्वी झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. जागतिक इनडोअर ॲथलेटिक्समध्ये साधारणपणे पुरुष आणि महिला खेळाडूंसाठी प्रत्येकी १३ क्रीडा प्रकारांचा समावेश असतो, ज्या तीन दिवसांच्या कालावधीत पार पडतात. या स्पर्धेच्या पोलंडमध्ये होणार्या आवृत्तीमध्ये, ४ बाय ४०० मीटर मिश्र रिले स्पर्धा प्रथमच आयोजित केली जाईल.



अमेरिकेतील सॅक्रामेंटो येथे एनबीएच्या नियमित हंगामातील सामन्यात स्पर्धा करताना सॅक्रामेंटो किंग्स आणि सॅन अँटोनियो स्पर्सचे खेळाडू.

# सॅमसनचे रोहित, विराटइतकेच महत्त्व! राजस्थान रॉयल्स संघात उणीव जाणवेल





**वृत्तसंस्था, जयपूर:**रोहित शर्मा किंवा विराट कोहली हे त्यांच्या संघासाठी जितके महत्त्वाचे आहेत, तितकाच संजू सॅमसन राजस्थान रॉयल्ससाठी महत्त्वाचा होता. त्यामुळे त्याची जागा घेऊ शकेल असा खेळाडू मिळणे अशक्यच आहे. आम्हाला त्याची उणीव निश्चित जाणवेल, असे वक्तव्य 'आयपीएल' संघ राजस्थानचा नवनियुक्त कर्णधार रियान परागने केले.

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) ट्वेन्टी–२० क्रिकेटच्या आगामी हंगामाला २८ मार्चपासून प्रारंभ होणार आहे. हंगामापूर्वी राजस्थान आणि चेन्नई संघाने खेळाडूंची आदलाबदल (ट्रेड) केली. यात सॅमसन राजस्थानकडून चेन्नईकडे गेला, तर चेन्नईने रवींद्र जडेजा आणि सॅम करन यांना राजस्थानकडे पाठवले. सॅमसनच्या जागी आता राजस्थान संघाच्या नेतृत्वाची धुरा रियान परागकडे सोपविण्यात आली आहे.''संजूबाबत बोलायचे, तर त्याची जागा घेऊ शकेल असा खेळाडू सापडणे अशक्यच आहे. आम्ही कदाचित त्याच्यासारखेच कौशल्य असलेल्या एखाद्या खेळाडूचा शोध घेऊ शकतो किंवा त्याच्या फलंदाजीच्या क्रमांकावर दुर्सया कोणाला पाठवू शकतो. मात्र, त्याच्यासारखा प्रभाव पाडणारा खेळाडू आम्हाला मिळू शकणार नाही. ज्या प्रकारे विराट कोहली किंवा रोहित शर्मा यांना कोणताही पर्याय नाही, त्याच प्रमाणे संजूलाही कोणताही पर्याय नाही. तो इतका उत्कृष्ट खेळाडू आहे,'' असे रियान म्हणाला.सॅमसनने दोन वेगवेगळ्या टप्प्यांवर मिळून ११ वर्षे राजस्थान रॉयल्सचे प्रतिनिधित्व केले. त्याच्या नेतृत्वाखालील राजस्थानने २०२२ मध्ये 'आयपीएल'ची अंतिम फेरी गाठली होती. सॅमसन 'आयपीएल'च्या गेल्या हंगामातील काही सामन्यांना मुकला होता. त्याच्या अनुपस्थितीत रियान परागनेच संघाचे नेतृत्व केले होते. मात्र, राजस्थानला १४ पैकी १० सामन्यांत पराभव पत्करावा लागला. त्यामुळे १० संघांच्या या स्पर्धेत राजस्थान नवव्या स्थानावर राहिला. असे असूनही आगामी हंगामासाठी रियानकडेच कर्णधारपदाची जबाबदारी सोपवली आहे.

''या वर्षी आमचा अधिक चांगल्या नियोजनावर आणि सामन्यांच्या शेवटच्या टप्प्यातील खेळ सुधारण्यावरही भर असेल. गेल्या वर्षी ५–६ सामने असे होते, जे आम्ही अगदी शेवटच्या षटकात किंवा शेवटच्या चेंडूवर गमावले होते.आम्ही अशा पराभवांचे विजयात रूपांतर केले असते, किंवा आमची रणनीती अधिक अचूक असती, तर परिस्थिती वेगळी असती. ते सामने जिंकून आम्ही बाद फेरीसाठी पात्र ठरलो असतो. यंदा आम्ही या चुका सुधारण्याचा प्रयत्न करू,'' असे रियानने स्पष्ट केले.

#### कर्णधार रियानचे वक्तव्य

राजस्थान रॉयल्सचे मोठे नुकसान –ड्यूप्लेसिस

' गेल्या काही वर्षांत राजस्थान रॉयल्स म्हणजेच संजू सॅमसन असे चित्र निर्माण झाले होते. तो या संघाचा चेहरा आणि प्रमुख खेळाडू होता. त्यामुळे आता त्याला गमावल्याने राजस्थान संघाचे मोठे नुकसान झाले आहे. त्याची उणीव राजस्थानला जाणवेल, असे मत दक्षिण आफ्रिकेचा माजी कर्णधार फॅफ ड्यूप्लेसिसने व्यक्त केले.' ''आयपीएलमधील सर्व आघाडीच्या संघांवर नजर टाकल्यास त्यात एकतरी नामांकित भारतीय खेळाडू दिसतो. रोहित शर्मा (मुंबई इंडियन्स), महेंद्रसिंह धोनी (चेन्नई सुपर किंग्ज) आणि विराट कोहली (रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु) हे दिग्गज खेळाडू त्यांच्या संघाचा चेहरा आहेत. माझ्या मते, सॅमसनही त्यांच्या पंगतीत बसू शकतो. तो राजस्थान रॉयल्सचा चेहरा होता,'' असे ड्यूप्लेसिस म्हणाला.' ''मी जेव्हा राजस्थान संघाबाबत विचार करतो, तेव्हा पहिले नाव सॅमसनचेच आठवते. आता सॅमसन अन्य संघात जाणे हा त्यांच्या चाहत्यांसाठी नक्कीच मोठा धक्का असेल. राजस्थान संघ आणि 'आयपीएल'साठीही ही मोठी गोष्ट आहे. आता राजस्थानला नव्या चेर्हयाचा शोध घ्यावा लागणार आहे. विशेषत: यशस्वी जैस्वालवरील जबाबदारी वाढेल. त्याला केवळ स्वत:च्या खेळाचा विचार करता येणार नाही,'' असेही ड्यूप्लेसिसने नमूद केले.प्रत्येक ट्वेन्टी–२० सामन्यात असे ३–४ निर्णय घ्यावे लागतात, जे सामन्याची दिशाच बदलून टाकतात.

# जसप्रीत बुमराहची टॉप ५ मध्ये नोंद



मुंबई–भारताने ८ मार्च रोजी टी२० विश्वचषक जिंकल्यापासून एकही टी२० आंतरराष्ट्रीय सामना खेळलेला नाही आणि जुलैपर्यंत या फॉरमॅटमध्ये एकही सामना होणार नाही. पण वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने एकही सामना न खेळता आयसीसी टी२० आंतरराष्ट्रीय क्रमवारीत अव्वल ५ मध्ये स्थान मिळवले आहे.

विश्वचषकानंतर दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यात काही टी२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले गेले, ज्या दरम्यान दक्षिण आफ्रिकेचा कॉर्बिन बॉश रेटिंग गुण गमावून सहाव्या स्थानावर घसरला, ज्यामुळे बुमराहला आयसीसी टी२० आंतरराष्ट्रीय गोलंदाजांच्या क्रमवारीत एक स्थान वर येण्याची संधी मिळाली आणि तो ७०२ रेटिंग गुणांसह पाचव्या स्थानावर पोहोचला आहे.

बांगलादेशचा कर्णधार मेहिदी हसन मिराजला पाकिस्तानविरुद्धच्या नुकत्याच झालेल्या घरच्या एकदिवसीय मालिकेतील त्याच्या प्रभावी कामगिरीबद्दल पुरस्कृत करण्यात आले आहे. बांगलादेशने ही मालिका २–१ ने जिंकली, ज्यात मिराजने तीन सामन्यांमध्ये पाच विकेट्स घेतल्या.

या कामगिरीमुळे मिराजने आयसीसी पुरुष एकदिवसीय गोलंदाजांच्या क्रमवारीत नऊ स्थानांची झेप घेत सातवे स्थान पटकावले आहे. त्याने एकदिवसीय अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीतही दोन स्थानांची सुधारणा करत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा अष्टपैलू क्रिकेटपटू बनला आहे. केवळ मिराजच नाही, तर तन्झिद हसन (३१ स्थानांची झेप), लिटन दास, तस्किन अहमद आणि मुस्तफिजुर रहमान यांच्या क्रमवारीतही सुधारणा झाली आहे.पाकिस्तानचा सलमान अली आघा आयसीसी पुरुष एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत नवव्या आणि अष्टपैलू क्रिकेटपटूंच्या क्रमवारीत दहाव्या स्थानावर पोहोचला आहे, तर कर्णधार शाहीन आफ्रिदी अष्टपैलू क्रिकेटपटूंच्या क्रमवारीत पंचविसाव्या स्थानावर पोहोचला आहे.

न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनरने टी–२० आंतरराष्ट्रीय क्रमवारीत आपला उत्कृष्ट फॉर्म कायम ठेवला आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सुरू असलेल्या पाच सामन्यांच्या टी–२० मालिकेतील सुरुवातीच्या सामन्यांमधील त्याच्या प्रभावी कामगिरीचा त्याला मोठा फायदा झाला आहे. सँटनरने टी–२० गोलंदाजांच्या क्रमवारीत ११ स्थानांची झेप घेत १३ वे स्थान पटकावले आहे. तसेच, त्याने अष्टपैलू क्रिकेटपटूंच्या क्रमवारीत कारकिर्दीतील सर्वोत्तम ७ वे स्थानही मिळवले आहे.भारतीय चाहत्यांसाठी अभिमानाची बाब म्हणजे, भारताचा अभिषेक शर्मा टी–२० फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थानी कायम आहे. न्यूझीलंडचे लॉकी फर्ग्युसन आणि डेव्हन कॉनवे यांनीही आपल्या क्रमवारीत सुधारणा केली आहे. दरम्यान, दक्षिण आफ्रिकेचा जॉर्ज लिंडे अष्टपैलू क्रिकेटपटूंच्या क्रमवारीत २३ व्या स्थानावर पोहोचला आहे, तर ऑटनील बार्टमनने गोलंदाजांच्या क्रमवारीत २३ स्थानांची झेप घेतली आहे.


### आयपीएल:केरळ उच्च न्यायालयाचा बीसीसीआयला दिलासा दिला

**तिरुवनंतपुरम**–येत्या २८ मार्च पासून आयपीएल २०२६ सुरु होणार आहे. या हंगामातील पहिला सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात खेळला जाईल. हा आयपीएलचा १९वा हंगाम असेल. स्पर्धेपूर्वी, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला मोठा दिलासा मिळाला आहे. केरळ उच्च न्यायालयानं आयपीएल नावावरुन निर्माण झालेला वाद मिटवला आहे.केरळ उच्च न्यायालयाचा बीसीसीआयला दिलासा : बीसीसीआय आपल्या लीगसाठी आयपीएल हे नाव वापरु शकतं का, असा प्रश्न उपस्थित करणारी एक जनहित याचिका केरळ उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. याचिकाकर्ते आशिक करुथ यांनी असा युक्तिवाद केला की, बीसीसीआयनं आयपीएल नावाचा केलेला वापर बेकायदेशीर आहे. सरन्यायाधीश सौमेन सेन आणि न्यायमूर्ती श्याम कुमार व्ही. एम. यांच्या खंडपीठानं ही याचिका फेटाळून लावली आहे. इतकंच नव्हे तर, न्यायालयानं असंही म्हटलं की, आयपीएल ही देशाची मअधिकृतफ स्पर्धा नाही, हे याचिकाकर्त्याला इतक्या वर्षानंतर अचानक आठवलं? या युक्तिवादात काहीही तथ्य नाही, असं न्यायालयानं स्पष्ट केलं आहे.



ऑस्ट्रेलियातील सिडनी येथे महिला आशियाई चषकाच्या उपांत्य फेरीत स्पर्धा करताना जपान आणि दक्षिण कोरियाच्या महिला खेळाडू.

# दिनेश कार्तिक पुन्हा झाला बाबा!



मुंबई –रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) साठी २०२६ चा आयपीएल हंगाम खास असणार आहे. गतविजेते म्हणून संघ मैदानात उतरत आपलं जेतेपद कायम राखण्याचा प्रयत्न करतील. दरम्यान, संघाचे मार्गदर्शक आणि फलंदाजी प्रशिक्षक, दिनेश कार्तिक यांनी गुढीपाडव्याच्या दिवशी चाहत्यांसह एक आनंदाची बातमी शेअर केली आहे. दिनेश कार्तिक आणि दिपिका पल्लीकल हे लेकीचे आईबाबा झाले आहेत.

दिनेश कार्तिकची पत्नी, दीपिका पल्लीकल हिने मुलीला जन्म दिला आहे. आज १९ मार्चला कार्तिकने स्वत: सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत ही आनंदाची बातमी शेअर केली. हा त्याच्या कुटुंबासाठी एक अत्यंत आनंदाचा प्रसंग आहे. दिनेश कार्तिकने आपल्या मुलीचं नावही जाहीर केलं आहे. दिनेश कार्तिक व दिपिका पल्लीकल यांनी जुळी मुलं आहेत आणि आता त्यांच्या छोट्या बहिणीचं त्यांनी आनंदाने स्वागत केलं आहे.

दिनेश कार्तिकने आपल्या लेकीचं नाव काय ठेवलं?

दिनेश कार्तिकच्या जुळ्या मुलांची नावं कबीर व झियान अशी आहेत. यानंतर जोडप्याने त्यांच्या लेकीचं नाव मराहा पल्लीकल कार्तिकफ असं ठेवलं आहे. हॅलो बेबी गर्ल असं कॅप्शन देत कार्तिकने ही पोस्ट शेअर केली असून यावर कमेंट्स आणि लाईक्सचा पाऊस पाडला आहे. विराट कोहलीने देखील दिनेश कार्तिकच्या लेकीच्या या पोस्टवर हार्ट इमोजीसह कमेंट केली आहे. दिनेश कार्तिक आणि दीपिका पल्लीकल यांनी २०१३ मध्ये साखरपुडा केल्यानंतर २०१५ मध्ये लग्न केलं. त्यांचे लग्न १८ ऑगस्ट रोजी ख्रिश्चन पद्धतीने आणि २० ऑगस्ट रोजी हिंदू पद्धतीने झालं. २०२१ मध्ये या जोडप्याला झियान आणि कबीर नावाची जुळं मुलं झाली. आता मुलीच्या आगमनाने कुटुंब आनंदाने भरून गेलं आहे. दीपिका पल्लीकल ही एक भारतीय स्क्वॅश खेळाडू असून तिने कार्तिकच्या क्रिकेट कारकिर्दीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. कार्तिकची क्रिकेट कारकीर्द नेहमीच चर्चेत राहिली आहे. तो आयपीएलमध्ये अनेक हंगामांसाठी आरसीबीकडून खेळला आणि फिनिशर म्हणून त्याची महत्त्वपूर्ण भूमिका होती. निवृत्तीनंतर, त्याने कोचिंगकडे आपला मोर्चा वळवला. प्रशिक्षणाचा अनुभव संघातील तरुण फलंदाजांसाठी खूप फायदेशीर ठरत आहे. आयपीएल २०२६ मध्ये आरसीबीची फलंदाजी मजबूत करण्यात तो महत्त्वाची भूमिका बजावेल. त्याने आपल्या कारकिर्दीत भारतीय संघासाठी २६ कसोटी, ९४ एकदिवसीय आणि ६० टी–२० सामने खेळून ३,४६३ धावा केल्या आहेत.

# लातूरच्या गोलाईत उभारली सार्वजनिक गुढी

## महापौर जयश्री सोनकांबळे, पोलिस अधिक्षक अमोल तांबे, जि.प. सीईओ राहूलकुमार मीना, मनपा आयुक्त सौ.मानसी मीना यांच्या हस्ते मानाच्या गुढीचे पूजन – विविध सामाजीक उपक्रमांचा संकल्प – स्वच्छता आणि पाणी बचतीबाबत जनजागृती संदेश

**लातूर/प्रतिनिधी :** लातूरच्या गंजगोलाईतील जगदंबा मंदिरासमोर गुढी पाडव्याच्या दिवशी गुरुवार १९ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता परंपरेप्रमाणे ''प्रथम मानाच्या सार्वजनिक गुढी''चे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून गोलाई भोवती गुढीची मिरवणूक काढत मंदिरासमोर सार्वजनिक गुढी उभारण्यात आली.

येत्या वर्षभरासाठी विविध सामाजीक उपक्रमांचा संकल्प करत प्लॅस्टीकमुक्ती सोबत वृक्ष संवर्धन, स्वच्छता अभियान आणि पाणी बचतीबाबत जनजागृती संदेश देण्यात आला. तसेच झाडे लावा झाडे जगवाचा संदेश देण्यात आला.

प्रारंभी लातूरच्या प्रथम नागरिक महापौर सौ. जयश्री सोनकांबळे, पोलिस अधिक्षक अमोल तांबे, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी राहूलकुमार मीना, मनपा आयुक्त सौ. मानसी मीना, मनपा क्षेत्रीय अधिकारी समाधान सुर्यवंशी, गंजगोलाईचे नगरसेवक गिरीश ब्याळे, गणेश गवारे, सौ.अग्रवाल, यांच्या हस्ते प्रथम मानाच्या सार्वजनिक गुढीचे पूजन करण्यात आले.

मान्यवरांचे स्वागत संस्थापक अध्यक्ष पंकज जैस्वाल, यंदाच्या महोत्सवाचे अध्यक्ष विकास कांबळे, स्वागताध्यक्ष अमोल गिते, अप्पू भरडे, बालाजी गवळी, विष्णू भुतडा, नितिन पडिले, रामभाऊ जवळगे, नवनाथ भोसले, बालाजी पारसेवार, विद्याताई



काळे, डी.व्ही. काळे, प्रभाकर चव्हाण, वामन पाठक, रवि जाधव, संदीप येरावार, सचिन गांगले आदिंनी केले.

तत्पूर्वी सार्वजनिक गुढी महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष पंकज जैस्वाल व गतवर्षीचे अध्यक्ष रामभाऊ जवळगे यांच्या हस्ते यंदाचे महोत्सवाचे अध्यक्ष विकास कांबळे आणि स्वागताध्यक्ष अमोल गिते यांच्याकडे यंदाच्या गुढी महोत्सवासाठीचा पदभार सुपूर्द करण्यात आला. त्यानंतर परंपरेप्रमाणे मान्यवरांच्या हस्ते गुढीचे पूजन करून ढोल ताशांच्या गजरात संपूर्ण गंजगोलाई भोवती जंगी मिरवणूक काढण्यात आली.

मिरवणूकी नंतर मान्यवरांच्या हस्ते

विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केलेल्या व्यक्तीचा प्रशस्तीपत्र देवून मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

यावेळी मान्यवरांची भाषणे झाली.

प्रस्ताविक पतंजलीचे प्रमूख योगशिक्षक विष्णू भूतडा यांनी केले. मनोगत संस्थापक अध्यक्ष पंकज जैस्वाल यांनी केले. गुढी महोत्सवाचे अध्यक्ष विकास कांबळे यांनी वर्षभरातील विविध संकल्प सांगितले. तर स्वागताध्यक्ष अमोल गिते यांनी वृक्ष चळवळीचे महत्व सांगीतले. सुत्र संचलन सारीका डांगे व कलशेट्टी यांनी केले.

पुरस्काराचे मानकरी

डॉ. भास्करराव रामराव पाटील,

शरद केशवराव झरे, आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन, महावितरणचे राहूल गाडे, आर टू आर फाउंडेशनचे राहूल पाटील, माझ लातूर परिवाराचे सक्रिय सदस्य महेबूब उर्फ बाबा शेख, आरोग्यदूत उद्धव तेलंगे, सर्पमित्र भिमाशंकर गाढवे,

योगशिक्षक प्राचार्या सुस्मिता सगरे,

प्राचार्या विद्या काळे, डी.व्ही. काळे,

डॉ. विजय अजनीकर, सर्फराज सय्यद, अँड. आर बी लोंढे, उद्योजक शिरीष जैन व आशिष जैन, डॉ. बी. सी. घाटे, गोर्विद राजे, संतोष धाराशिवकर, पत्रकार विनोद कांबळे, लिंबराज पन्हाळकर, सचिन अंकुलगे, रामभाऊ जवळगे, धनराज माने, रशीद तांबोळी, दिनेश कबाडे आदीना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

विविध सामाजीक संदेश

सार्वजनिक गुढी पाडवा महोत्सवाच्या अनुषंगाने पर्यावरण पूरक उपक्रमांचे संदेश देण्यात आले. स्वच्छता संदेश, पाणी बचतीचे महत्व, वृक्ष संवर्धनाचा संदेश, वाहतूक नियमाचे पालन, शिस्तीचे महत्व या बाबत पत्रक वितरीत करून पर्यावरणपूरक जनजागृती करण्यात आली.

प्रारंभी जगदंबा मंदिरातील देवीची अभिषेक पूजा विश्वस्त शिवशंकर पारशेट्टी दाम्पत्य, काळे दाम्पत्यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी नारायण भूतडा, किशोर जैन, प्रभाकर शिरूरे, काकासाहेब घुटे, प्रकाश शिदे, दिनेश कबाडे आदिंचिही उपस्थिती होती.

# सॅमसंगने भारतात फ्लॅगशिप स्मार्टफोन्स अधिक सुलभ करण्यासाठी 'गॅलॅक्सी फोरएवर' लॉन्च केले

ग्राहक आता १२ नो-कॉस्ट ईएमआयमध्ये डिव्हाइसची किमत अर्धी भरून गॅलॅक्सी ड२६ अल्ट्रा किंवा गॅलॅक्सी ड२६ प्लस एक वर्षासाठी खरेदी करू शकतात

१२ महिन्यांनंतर उद्योग-प्रथम नो-क्वेश्र्चन्स-एस्क्ड 'रिटर्न, रिटेन किंवा अपग्रेड' फ्लेक्सिबिलिटी

सॅमसंग.कॉम आणि देशभरातील १,५००+ सॅमसंग एक्सपीरियन्स स्टोअर्समध्ये उपलब्ध

गुरूग्राम, भारत - १९ मार्च, २०२६ - सॅमसंग, भारतातील सर्वात मोठी कन्स्यूमर इलेक्ट्रॉनिक्स ब्रँड, ने आज भारतात गॅलॅक्सी फोरएवर लॉन्च करण्याची घोषणा केली, ज्यामुळे त्याचे फ्लॅगशिप स्मार्टफोन्स अधिक सुलभ करण्यासाठी एक नवीन ओनरशिप मॉडेल सादर केले.

प्रोग्राम ग्राहकांना सॅमसंग केर+द्वारे संचालित नो-क्वेश्र्चन्स-एस्क्ड-रिटर्न पॉलिसीसह एक वर्षानंतर ५०% अस्यूरड बायबॅकच्या विरुद्ध ५०% अपफ्रंट डिस्काउंटचे वचन देते.

हे ग्राहकांना क्रेडिट कार्ड किंवा सॅमसंग फिनान्स+द्वारे १२ नो-कॉस्ट ईएमआयमध्ये डिव्हाइसची किमत अर्धी भरून एक वर्षासाठी गॅलॅक्सी ड२६ अल्ट्रा किंवा गॅलॅक्सी ड२६ प्लसचे मालक बनण्यास सक्षम करते.

सॅमसंग फिनान्स+ ग्राहकांना किमान दस्तऐवजीकरण आणि द्रुत लोन मंजूरीसह सहज क्रेडिट मिळवण्यासाठी डिझाइन केलेले आहे.

एक वर्षानंतर, क्रेडिट कार्ड पेमेंट मोडद्वारे ऑप्ट-इन केलेले ग्राहक थेट ५०% अस्यूरड बायबॅक मिळवू शकतात किंवा अतिरिक्त १२ नो-कॉस्ट ईएमआआद्वारे बाकीचे ५०% पे करू शकतात.

सॅमसंग फिनान्स+साठी ऑप्ट केलेल्या ग्राहकांना फक्त रिटर्न करावे लागेल आणि पुढील गॅलॅक्सी फ्लॅगशिप स्मार्टफोनमध्ये अपग्रेड करावे लागेल. डिव्हाइस राखण्यासाठी, ग्राहकांना १३व्या महिन्यात बाकीचे ५०% पे करावे लागेल.

गॅलॅक्सी फोरएवरमध्ये सॅमसंग केर+ (अकसीडेंटल आणि लिक्विड डॅमेज प्रोटेक्शन झिरो डिडक्टिबल्ससह) देखील समाविष्ट आहे, ज्याची किंमत खछ्ठ १३,९९९ आहे, १३ महिन्यांसाठी, डिव्हाइस संरक्षण आणि नो-क्वेश्र्चन्स-एस्क्ड-रिटर्नचे वचन देते.

# राज्य शासनाच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार-२०२५ साठी प्रवेशिका पाठविण्याकरीता मुदतवाढ

**मुंबई/प्रतिनिधी :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका मागविण्याचा अंतिम दिनांक १५ मार्च, २०२६ असा होता. आता पुरस्कारांसाठी प्रवेशिका मागविण्याकरीता दि. ३१ मार्च, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून आणि मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील स्पर्धकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२ येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. तसेच अर्जाचे नमुने https://dgipr.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावरही उपलब्ध आहेत.

# लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये गुढीपाडवा सण उत्साहात साजरा



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान, संचलित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलमध्ये नववर्ष तथा गुढीपाडवा हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी शाळेच्या शिक्षिका रुपाली कोकाटे यांनी विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीतील गुढीपाडव्याचे विशेष महत्व याविषयी विस्तृत माहिती दिली. विशेषकरून महाराष्ट्रात नववर्ष हा गुढीपाडवा म्हणून साजरा केला जातो तसेच याच दिवशी प्रभू रामचंद्रांनी वनवास संपवून रामराज्य स्थापन केले व आयोध्या नगरीत प्रवेश केला आणि त्या दिवशी येथील लोकांनी आपल्या घरावर गुढ्या उभारुन, घराच्या दारांना तोरणं बांधून प्रभू रामचंद्रांचे स्वागत केले होते. याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेचे समन्वयक रौफ शेख, समन्वयिका संगीता शेटे, रुपाली कोकेटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने, विद्या पाटील, संगीता शेटे यांनी गुढीची पूजा केली. सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी गुढीपाडव्याच्या व मराठी नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# मुक्तांगण इंग्लिश स्कुल मध्ये नववर्ष तथा गुढीपाडवा साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** विशालनगर परिसरातील श्री साईबाबा मंदिरासमोरील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचलित मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्ये नववर्ष तथा गुढीपाडवा हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

शाळेच्या शिक्षिका माधुरी वाघमारे यांनी बालकांना भारतीय संस्कृतीतील गुढीपाडवा या सणाविषयी माहिती दिली. या दिवशी आयोध्या नगरीतील लोकांनी आपल्या घरावर गुढ्या उभारुन, घराच्या दारांना तोरणं बांधून प्रभू श्रीरामाचे स्वागत केले होते या प्रसंगाची आठवण करून देण्यात आली. तसेच या दिवशी भगवान ब्रह्माची विधीवत पूजा केली जाते असे सांगितले.

यावेळी शाळेच्या प्राचार्या सुमेरा शेख यांनी गुढीची पूजा केली. सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी गुढीपाडव्याच्या व मराठी नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमाचे सूत्र संचालन शाळेच्या शिक्षिका प्रणिता सुरवसे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



# फिलिपाईन्समधील भारतीय समाजाचे सेवा आणि व्यावसायिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान - मंत्री जयकुमार रावल

## मनिला येथे मंत्री रावल यांचा मराठी बांधवांशी संवाद

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी समाज जगभर पसरलेला असला तरी मातृभूमीशी त्यांचे नाते अतूट आहे. फिलिपाईन्समधील भारतीय समाज संख्येने मर्यादित असला तरी व्यापार, उद्योग, सेवा आणि व्यावसायिक क्षेत्रात त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन पणन आणि राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी मनिला येथे केले.

मंत्री रावल यांनी मनिला येथे आयोजित विशेष कार्यक्रमात भारतीय तसेच मराठी बांधवांशी संवाद साधला. या कार्यक्रमात प्रवासी मराठी समाजाशी संबंध अधिक दृढ करण्यावर भर देत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून प्रवासी मराठी समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या १२ कलमी उपक्रमांची घोषणा केली. त्यामध्ये जागतिक महाराष्ट्र मंडळांचा डेटाबेस तयार करणे, अधिकृत ई-मेल प्रणालीद्वारे संपर्क, डिजिटल माध्यमातून जागतिक महाराष्ट्र दिन साजरा करणे, जागतिक प्रवासी महाराष्ट्र मंडळ स्थापन करणे, स्वतंत्र लोगो व



संकेतस्थळ विकसित करणे, डिजिटल नोंदणी पोर्टल सुरू करणे, आभासी संवाद सत्रे आयोजित करणे, गुंतवणूक, विद्यार्थी व सांस्कृतिक विषयांसाठी सिंगल विंडो प्रणाली, एमआयडीसी समन्वय यंत्रणा, तक्रार निवारण यंत्रणा, परराष्ट्र मंत्रालय व भारतीय दूतावासांच्या सहकार्याने विद्यार्थी उपक्रम आणि प्रभावी घोषवाक्य तयार करणे यांचा समावेश आहे.

यावेळी मंत्री रावल यांनी महाराष्ट्र आणि जागतिक मराठी समाज यांच्यातील नाते अधिक दृढ करण्याची गरज व्यक्त केली. मंत्री रावल म्हणाले की, मनिला, सेबू आणि दावाओ या शहरांमध्ये भारतीय वंशाचे नागरिक आयटी, बीपीओ, आरोग्य व वित्तीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. महाराष्ट्रीयन समाजानेही आयटी, औषधनिर्मिती, सल्लागार सेवा आणि उद्योजकता क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली असून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा जागतिक स्तरावर प्रसार करण्यात त्यांचा मोठा वाटा आहे, असे त्यांनी नमूद केले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली भारत-फिलिपाईन्स संबंध अधिक बळकट होत असून माहिती तंत्रज्ञान, डिजिटल अर्थव्यवस्था, अक्षय ऊर्जा, संरक्षण सहकार्य आणि प्रक्रिया उद्योग या क्षेत्रांत मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. महाराष्ट्र हे औद्योगिक व वित्तीयदृष्ट्या अग्रगण्य राज्य असून फिलिपाईन्सला आसियान प्रदेशाचे प्रवेशद्वार मानून सहकार्य वाढविण्याची आवश्यकता असल्याचेही मंत्री रावल यांनी स्पष्ट केले.

नागपूरचे मूळ रहिवासी नरेंद्र सिंगरू व रमोलाआईक सिंगरू यांनी त्यांच्या निवासस्थानी मंत्री रावल यांच्यासाठी स्नेहभोजनाचे आयोजन केले होते. त्याचबरोबर मनिलातील मराठी बांधवांनाही आमंत्रित करण्यात आले होते. या प्रसंगी भारताचे मनिलातील राजदूत हर्ष कुमार जैन, प्रथम सचिव निलेश कुमार राय उपस्थित होते. आशियाई विकास बँकेचे अधिकारी एल. सत्यश्रीनिवास, अर्जुन सिंह, क्रिशन रोतेला तसेच राजशिष्टाचार विभागाचे सचिव डॉ. राजेश गवांदे हे दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले. कार्यक्रमास मनिलातील मराठी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र शासन प्रवासी मराठी समाजाला राज्याच्या विकासातील महत्त्वाचा भागीदार मानत असून व्यापार, गुंतवणूक आणि सांस्कृतिक संबंध अधिक मजबूत करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मंत्री रावल यांनी केले. तसेच त्यांनी उपस्थितांना आणि मनिलातील सर्व मराठी बांधवांना गुढी पाडव्याच्या शुभेच्छा दिल्या.

# शिक्षण सहसंचालक डॉ. बाबासाहेब भोसले यांचे स्वागत

**लातूर/प्रतिनिधी :** नांदेड येथील विभागीय शिक्षण सहसंचालक डॉ. बाबासाहेब भोसले यांनी राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेजला नुकतीच सदिच्छा भेट दिली असता कॉलेजतर्फे संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते डॉ. भोसले यांचा शाल, फेटा व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे नागनाथ बुटकुलवार यांच्यासह संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, संस्था संचालक कविता केंद्रे, अश्विनी केंद्रे, राजेंद्र जायेभाये, अरुण करदुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन डॉ. नाजमीन सय्यद यांनी केले तर आभार राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर.



एम. चव्हाण यांनी मानले. प्रारंभी प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी डॉ. बाबासाहेब भोसले व नागनाथ बुटकुलवार यांचे स्वागत केले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# रमजान ईद सणानिमित्त लातूर शहरात वाहतूक नियोजन : पोलीस प्रशासनाचा सर्वंकष बंदोबस्त

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरात दिनांक २१ मार्च २०२६ रोजी रमजान ईद सण मोठ्या उत्साहात व धार्मिक श्रद्धेने साजरा करण्यात येणार आहे. या दिवशी सकाळी ०७.०० ते ११.०० वाजेदरम्यान पोलीस स्टेशन शिवाजीनगर व एमआयडीसी हद्दीतील दयानंद गेट, बार्शी रोड येथील ईदगाह मैदानावर मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव नमाज पठणासाठी एकत्र येणार आहेत. ईदगाह मैदान हे लातूर–बार्शी मुख्य मार्गावर स्थित असल्यामुळे या मार्गावर नेहमीच मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. सणाच्या पार्श्वभूमीवर येथे मोठी गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन, नागरिकांची सुरक्षितता, वाहतुकीची सुरळीतता व कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी लातूर पोलीस प्रशासनाकडून विशेष वाहतूक




नियोजन करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली व अप्पर पोलीस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण यांचे देखरेखीखाली सणादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, तसेच वाहतूक कोंडी टाळता यावी यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत, ईदगाह मैदान परिसरातील मुख्य मार्गावरील वाहतूक तात्पुरती बंद करून ती पर्यायी मार्गाने वळविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे नमाज पठणासाठी येणाऱ्या नागरिकांना कोणताही अडथळा निर्माण होणार नाही व वाहतुकीचे व्यवस्थापन प्रभावीपणे करता येणार आहे.

बंद करण्यात आलेले मार्ग. ईदगाह मैदान, दयानंद गेट परिसर, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते अप्पे ऑटो शोरूम (बार्शी रोड) तसेच त्यालगतचा स्व. विलासराव देशमुख मार्ग (रेल्वे लाईन समांतर रस्ता) हा संपूर्ण मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांसाठी तात्पुरता बंद ठेवण्यात येणार आहे. या मार्गावर एस.टी. बसेस, ट्रक, टेम्पो, खासगी वाहने, टॅक्सी, दुचाकी इत्यादी सर्व वाहनांना प्रवेश बंद असेल.

पर्यायी मार्गांची व्यवस्था. वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी व नागरिकांना सुलभ मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी विविध पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आले आहेत.

शिवाजी चौकातून पी.व्ही.आर. चौकाकडे जाणारी जड वाहने व एस.टी. बसेस ह्या तहसील कार्यालयासमोरून ओव्हर ब्रिजमार्गे औसा रोड – राजीव गांधी चौक – छत्रपती चौक (टी–पॉईंट) मार्गे जातील.

हलकी वाहने (दुचाकी, तीनचाकी, चारचाकी) छत्रपती शिवाजी महाराज चौक – औसा रोड – आशियाना टी–पॉईंट – खाडगाव रोड – पी.व्ही.आर. चौक किंवा अंबाजोगाई रोड – जटाळ हॉस्पिटल – शामनगर – इंडिया नगर मार्गे पी.व्ही.आर. चौक.

बार्शी रोडवरून शहरात येणारी जड वाहने : पी.व्ही.आर. चौक – औसा टी–पॉईंट – राजीव गांधी चौक मार्गे वळविण्यात येतील. इतर वाहने : पी.व्ही.आर. चौक – खाडगाव टी–पॉईंट – आशियाना मार्गे औसा रोड किंवा एमआयडीसी – एक नंबर चौक – इंडिया नगर रोड – जुना रेणापूर नाका मार्गे शहरात प्रवेश करतील.

सदर वाहतूक नियोजन व निर्बंध दिनांक २१/०३/२०२६ रोजी सकाळी ०५.०० ते दुपारी १३.०० वाजेपर्यंत लागू राहतील. सणाच्या पार्श्वभूमीवर ईदगाह परिसर व शहरातील प्रमुख ठिकाणी पोलीस अधिकारी व अंमलदारांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. वाहतूक नियंत्रणासाठी विशेष पथके नियुक्त करण्यात आली असून, नागरिकांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी पोलीस कर्मचारी सतत कार्यरत राहतील. सीसीटीव्ही निरीक्षण, पेट्रोलिंग, तसेच संवेदनशील ठिकाणी अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करून सुरक्षिततेची पूर्ण काळजी घेण्यात येत आहे.

## बांधकाम कामगारांच्या मुलांच्या शिक्षणावर घाला

### मंडळाचा काळा निर्णय तात्काळ मागे घ्या!; वडार समाज संघ, महाराष्ट्र राज्य संघटनेची मागणी

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्याकडून दि. १ जानेवारी २०२६ रोजी मंडळाचे सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक कुंभार यांनी निर्गमित करण्यात आलेले परिपत्रक म्हणजे श्रमिक बांधकाम कामगारांच्या पोटावर लाथ मारणारा, त्यांच्या मुलांचे शिक्षण उध्वस्त करणारा आणि थेट भारतीय संविधानावर घाला घालणारा काळा निर्णय असल्याची घणाघाती टीका सामाजिक कार्यकर्ते भटक्या विमुक्त समूहाचे अभ्यासक तथा वडार समाज संघ, महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्याध्यक्ष श्रीकांत मुद्दे यांनी मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

राज्यभरातील तसेच देशभरातील बांधकाम कामगार हे प्रामुख्याने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय घटकातील असून हे कामगार स्थलांतरित रोजनदारीवर काम करणारी आणि झोपडपट्ट्यात हाल अपेष्टात जीवन जगणारे आहेत अशा कामगारांच्या मुलांसाठी शिक्षण हाच एकमेव अशेचा किरण असताना त्यावरच निर्बंध घालण्याचा हा निर्णय म्हणजे कामगार विरोधी मानसिकतेचा कळस आहे. भारतीय संविधानातील कलम २१ अ, १५ (४) १५(५) व ४६ ही केवळ पुस्तकी कलमे नसून ती बहुजन समाजाच्या उन्नतीची हमी आहेत. मात्र या परिपत्रकाच्या माध्यमातून श्रमिकांच्या मुलांना शिक्षणापासून दूर ठेवण्याचा सुनियोजित डाव रचण्यात आला असून हा निर्णय म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्यायाच्या विचारांची उघडपणे अडवणूक आहे. विशेष म्हणजे मंडळ स्थापनेपासून १२ डिसेंबर २०२५ पर्यंत अशा प्रकारचा कोणताही निर्बंध कधीही अस्तित्वात नव्हता, मग अचानक हा अधिकार कोणाच्या सांगण्यावरून कोणाच्या फायद्यासाठी आणि कोणाच्या दबावाखाली वापरण्यात आला हा प्रश्न हा संपूर्ण महाराष्ट्रातील कामगार विचारत आहेत. अत्यंत गंभीर बाब म्हणजे कामगारांकडून आकारण्यात येणाऱ्या १% निधी हा शासनाचा नसून पूर्णतः कामगारांचा हक्काचा निधी आहे, मात्र त्याच निधीतून कामगार व मालक प्रतिनिधींचा सहभाग डावलून खाजगी कंपन्यांना टेंडर देणे, तथाकथित सामाजिक उपक्रमांच्या नावाखाली कोट्यावधींचा अपव्यय केल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी पैसा नाही पण खाजगी कंपन्यांसाठी कोट्यावधी खुले हा सरळ सरळ विश्वासघात आहे. हे परिपत्रक म्हणजे शब्दांचा खेळ करून श्रमिकांना फसवण्याचा आणि त्यांच्या मुलांचे भवितव्य अंधारात ढकलण्याचा सुनियोजित कट आहे. दि.१ जानेवारी २०२६ रोजी काढलेले परिपत्रक तात्काळ रद्द करण्यात यावे बांधकाम कामगारांच्या मुलांना पूर्वीप्रमाणे अखंड शैक्षणिक आर्थिक सहाय्य देण्यात यावे, मंडळाचा निधी फक्त कायद्यानुसार कल्याणकारी योजनांसाठीच वापरण्यात यावा आतापर्यंत झालेल्या निधीच्या वापराची एसआयटी मार्फत उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, आता कुठे वडार समाजापर्यंत या योजनांविषयी माहिती झाली होती, कारण अद्यापही या योजनांपासून वडार समाज हा कोसो दूरच आहे आणि अशावेळी घेतलेला हा निर्णय म्हणजे खऱ्या कामगारांवरती अन्याय करणारा आहे, असेही यावेळी सामाजिक कार्यकर्ते भटक्या–विमुक्त समूहाचे अभ्यासक तथा वडार समाज संघ, महाराष्ट्र राज्य संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष श्रीकांत मुद्दे यांनी निवेदनाद्वारे केली आहे. याप्रसंगी रमाकांत मुद्दे, सचिन वाडीकर, कृष्णा धोत्रे, राम आलाकुंटे, बाबासाहेब भांडेकर आदी समाज बांधव उपस्थित होते.

## निलंग्यात प्रधानमंत्री आवास योजनेवर कार्यशाळा: निलंगा तालुक्यातील प्रलंबित घरकुलांची कामे मार्गी लावणार

**निलंगा/प्रतिनिधी :** लातूर आवास अभियान (ग्रामीण) अंतर्गत संपूर्ण जिल्ह्यात दि. १७ मार्च ते १५ ऑगस्ट या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. या अभियानाद्वारे प्रलंबित घरकुलांची कामे जलद गतीने पूर्ण करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे गटविकास अधिकारी सतीश पाटील यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला सुरक्षित व पक्के घर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शासनाच्या विविध आवास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी निलंगा येथील पंचायत समितीच्या सभागृहात तालुकास्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सतीश पाटील उपस्थित होते. यावेळी प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) तसेच राज्य पुरस्कृत आवास योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करत संबंधित अधिकारी व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले. कार्यशाळेत संबंधित अधिकारी, कर्मचारी, विस्तार अधिकारी (सांख्यिकी), घरकुल शाखा सहाय्यक, संगणक ऑपरेटर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते, तसेच तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक व ग्रामपंचायत अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा–२ अंतर्गत महिला शेतकरी गटांसाठी कृषी अवजारे बँक स्थापनेची संधी

**लातूर/प्रतिनिधी :** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (टप्पा–२) अंतर्गत ग्रामीण भागात शेतकऱ्यांना आधुनिक कृषी यंत्रसामग्री भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्यासाठी एक गाव, एक कृषी अवजारे बँक या तत्त्वावर महिला शेतकरी गटांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत नोंदणीकृत महिला स्वयंसहाय्यता गट, उमेद महिला गट किंवा महिला ग्राम संघ यांना गावस्तरावर कृषी अवजारे बँक स्थापन करण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत.

**५ एप्रिलपर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करा**

या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा यंत्रसामग्रीवर होणारा खर्च कमी होईल आणि शेती उत्पादकता वाढेल. निवड झालेल्या महिला गटाला कमाल ४० लाख रुपयांपर्यंत लाभ मिळू शकतो. फार्मर कप स्पर्धेत सहभागी झालेल्या महिला शेतकरी गटांना या योजनेअंतर्गत प्राधान्य देण्यात येईल. तरी इच्छुक महिला गटांनी https://dbt-ndksp-agribusiness.mahapocra.gov.in/ या अधिकृत पोर्टलवर जाऊन ५ एप्रिल २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावेत. अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन असून, प्रत्येक गावातील पात्र गटांची निवड पारदर्शक पद्धतीने केली जाईल. लातूर जिल्ह्यातील महिला गटांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रकल्प संचालक दिलीप जाधव यांनी केले आहे.

## जनकल्याण निवासी विद्यालयात वर्षप्रतिपदेला अग्निहोत्राने हिंदू नववर्षाचे स्वागत



**लातूर/प्रतिनिधी :** हरंगुळ (बु.), ता. लातूर – जनकल्याण निवासी विद्यालयात वर्षप्रतिपदा तथा हिंदू नववर्षाचे स्वागत पारंपरिक पद्धतीने अग्निहोत्राच्या माध्यमातून करण्यात आले. विद्यालयाच्या मैदानात अग्निहोत्रांसाठी ११ अग्नीकुंडांची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी सुमारे सहाशे विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभागी होत नववर्षाची मंगल सुरुवात केली.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी संकल्प पाठ, अग्निहोत्र मंत्र, ईश्वरस्तुतीप्रार्थना उपासना मंत्र, दीपप्रज्वलन मंत्र,प्रात:कालीन आहूती मंत्राने सह संपूर्ण विधी पार पाडले. त्यानंतर राष्ट्र मंत्राच्या माध्यमातून राष्ट्रभावना व्यक्त करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी उज्ज्वल आयुष्य, तेज, बल आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा मिळावी, अशी प्रार्थना केली.

या अग्निहोत्र कार्यक्रमासाठी प्रकल्पाध्यक्ष श्री. प्रकाशजी लातूरे हे सहपरिवार उपस्थित होते. तसेच इयत्ता सहावीचे पालक श्री. सचिन देशमुख यांनी सहकुटुंब सहभाग नोंदवला. यावेळी वसतिगृहातील सर्व पालक पर्यवेक्षकही कार्यक्रमात सहभागी झाले होते.

कार्यक्रमाचे नियोजन श्रीमती संगीता ताई भदाडे यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी संचलन इयत्ता नववीतील विद्यार्थिनी समृद्धी चौधरी, प्रणाली थोरबोले, ईश्वरी तम्मेवार आणि ओम मगर यांनी केले.

विद्यालयात पारंपरिक पद्धतीने साजरा झालेला हा कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, राष्ट्रभक्ती आणि आध्यात्मिकतेची जाणीव वाढवणारा ठरला.




टोनर रिफिलिंग

फक्त ₹ ३००/-

मास्टरप्लेट ट्रेसिंग क्वालिटी

संपर्क

8600025070

9028376965

प्रिंटर्स पॅराडाईस

प्रिंटर रिपेअरिंग

कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस

टोनर रिफिलिंग


### स्वामी ..

पाऊल पळत सुटे
सरता सरेना वाट
मन कधीचं पोचले
स्वामी पाहती वाट

माहेर सासर दोन्ही
तीर्थ अक्कलकोट
बदललेभाग्य माझे
दारी टेकता ललाट

स्वामी रुप पाहता
घडे जीव शिव गाठ
गुरु शिष्य बंधनात
जन्मजन्मांतर गाठ

अलगद गाती ओठ
समर्थ ग्रंथांचे पाठ
स्वामी आहेत मागे
निर्धास्त होते पाठ

शंख ध्वनी मठात
धुपाचा घम घमाट
तेजःपुंज गुरूराज
दिपवी लखलखाट

आरतीत मंत्र मुग्ध
पालखीचा तो थाट
गात्रगात्र स्वामीमय
मुकाही होईल भाट

अन्नपूर्णाआशीर्वाद
सुग्रास प्रसाद ताट
स्वामी कृपा प्रासादे
केव्हांच भरले पोट

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६

## दयानंद विज्ञानमध्ये संगणकशास्त्र विभागातील बी.सी.एस.तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना निरोप




**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागातील बी.सी.एस.तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम दि.१५ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेला होता.याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे,हिंदी विभाग प्रमुख डॉ.गजानन बने,विभाग समन्वयक डॉ.संगीता जाजू,प्रा.सुजाता काळे,प्रा.वैभव कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी अध्यक्षीय समारोपामध्ये महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी विद्यार्थ्यांना जीवनात यश मिळवायचे असल्यास शिस्त आणि मेहनतीशिवाय पर्याय नाही.त्यामुळे मेहनत, जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर करिअर घडवा असे सांगितले.प्रास्ताविकातून संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे यांनी आपली काम करण्याची पद्धत आणि कामाचे कौशल्य इतक्या उत्कृष्ट पद्धतीने असावे की, त्यावरती कोणीही प्रश्नचिन्ह उपस्थित नाही केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.तसेच डॉ.गजानन बने असे म्हणाले, महाविद्यालयातील जीवन आणि या जीवनातील आठवणी अनुभवांची शिदोरी असते,त्यात जुळणारे मित्र हे आयुष्यभराचे सोबती बनतात आणि जीवनाला योग्य दिशा मिळते.तसेच डॉ.संगीता जाजू असे म्हणाल्या की, कॉलेज जीवन हे करिअर घडविण्याचे असते, तुम्ही ज्या पद्धतीने योग्य सवय,वळण लावून व वेळेचे नियोजन करून यशस्वी झाले पाहिजे असे त्यांनी आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विणा भंडारी, गौरी मराळे, रितिका राठोड, सादेवड विश्वजीत, गंगाधर सुरणार, मधुरा धानोरकर,वैभवी मर्डिकर यांनी केले तर आभार विद्यार्थीनी वैभवी मार्डिकरने मानले.यावेळी बी.सी.एस.तृतीय वर्षातील तनुजा भोसले, प्रणव कुलकर्णी आणि श्रद्धा जाधव या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून महाविद्यालयातील तीन वर्षांच्या आठवणी सांगितल्या.याप्रसंगी प्रा.मंगेश सुगरे, प्रा.पूजा नंदगावे, प्रा.व्ही.ए.पवार, प्रा.आशा बोराडे, प्रा.अरूणा चौधरी, प्रा.सुमित जोशी, प्रा.बांगड, प्रा.दीपाली दाडगे, प्रियंका हिप्परकर, मानसी गायकवाड, संजय पांडे, राहुल बनभेरू आदींची उपस्थिती होती.महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांचे मनापासून आभार व्यक्त करताना अतिशय भावपूर्ण वातावरणात निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला.


निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र

सितारी विमा सेवा केंद्र

दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.

वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत

जमीरोद्दीन सितारी

चेअरमन क्लक मेंबर CLIA

एजंट भरती चालू आहे.

संपर्क → Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६